रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ६७
www.ramprahar.com
# राम प्रहर
बुधवार, २४ सप्टेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार; सात जण गजाआड



**ठाणे :** कल्याणच्या एका कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीशी मैत्री करत आठ जणांनी सामूहिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पोलिसांनी आठपैकी सात आरोपींना अटक केली असून उर्वरित एकाचा शोध सुरू आहे. सुरुवातीला एका नराधमाने अल्पवयीन विद्यार्थिनीसोबत संबंध प्रस्थापित करून तिचा व्हिडीओ तयार केला होता. त्यानंतर हा व्हिडीओ आपल्या मित्रांना पाठवला. मग व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत त्या अल्पवयीन विद्यार्थिनीवर जवळपास पाच महिने सामूहिक बलात्कार करण्यात आला. पीडित मुलगी गर्भवती राहिल्यावर सारा प्रकार समोर आला. या घटनेप्रकरणी पोलिसांनी सात नराधमांना बेड्या ठोकल्या आहेत. आरोपींना कल्याण न्यायालयात हजर केले असता सातही जणांना आठ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

अंतरंग
वडाळे तलाव परिसरात रोड रोमियोंना दणका/३
विदेशी पक्ष्यांची चोरी करणारे दोघे जेरबंद/५
कॅरम लीगमध्ये राजेश गोहिल विजेता/८

# राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना २२१५ कोटींची मदत

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागातील ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांना दोन हजार २१५ कोटी रुपये मदत करण्याचे शासन आदेश दिले असून एक हजार ८२९ कोटींची मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहचल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि.२३) दिली. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.



मराठवाड्यासह महाराष्ट्रातील अन्य काही भागात मोठ्या प्रमाणावर पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळे तिथे पूरस्थिती निर्माण झाली असून शेतीचे नुकसान झाल्याचे चित्र आहे. याचा आढावा घेऊन मुख्यमंत्री फडणवीस यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्या वेळी त्यांनी मदतीची घोषणा केली.

धाराशिव, अहिल्यानगर, सोलापूर, बीड, परभणी, धुळे, जळगाव आदी जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली आहे. आतापर्यंत ९७५ मिलिमीटर पाऊस झाला असून सरासरीपेक्षा १०२ टक्के जास्त पाऊस झाला आहे. पुरामुळे आठ जणांचा मृत्यू झाला असून १० जण जखमी झाले आहेत. पूरग्रस्त भागात एनडीआरएफ, एसडीआरएफच्या १७ तुकड्या तैनात केल्या आहेत. अनेकांना हेलिकॉप्टरद्वारे सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. या भागांचा आढावा घ्यायला मंत्र्यांना आणि पालकमंत्र्यांना सांगितले आहे. आपण स्वतः काही भागांना भेट देणार आहोत, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. (पान २ वर..)

### पूरग्रस्त भागाचा आज करणार दौरा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बुधवारी (दि. २४) अतिवृष्टी आणि पूरस्थितीचा आढावा घेण्यासाठी पूरस्थितीग्रस्त भागाचा दौरा करणार आहेत. पूरग्रस्तांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारचे प्रयत्न अखंडपणे सुरू असून शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले आहे.



# मंत्रिमंडळ बैठकीत विविध निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि. २३) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्याच्या विकासाला गती देणारे आठ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. या निर्णयांमध्ये आरोग्य, परिवहन, महसूल, गृह आणि गृहनिर्माण विभागांच्या विविध प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली.



आरोग्य क्षेत्रासाठी महत्त्वाचा निर्णय राज्यातील शासकीय रुग्णालयांचे सक्षमीकरण करण्यासाठी आणि राज्य आरोग्य हमी सोसायटीला राखीव निधी उपलब्ध करून देण्यासाठी मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. विस्तारित महात्मा फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत-जन आरोग्य योजनेतून उपचारासाठी मिळणाऱ्या निधीचा विनियोग यासाठी केला जाणार आहे.

परिवहन क्षेत्राला चालना नागपूर-नागभीड रेल्वे मार्गाच्या ब्रॉडगेज रूपांतरणाच्या कामाला गती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. १९६.१५ किलोमीटरच्या या नॅरोगेज मार्गाच्या ब्रॉडगेज रूपांतरणासाठी ४९१ कोटी पाच लाख रुपयांच्या खर्चाला मान्यता देण्यात आली.

अकोला शहरातील बस स्थानक, भाजी बाजार आणि वाणिज्य संकुलासाठी अकोला येथील २४ हजार ५७९.८२ चौ.मी. जागा महापालिकेला हस्तांतरित करण्यास मंजुरी देण्यात आली. सोलापूर जिल्ह्यातील कॉ. मीनाक्षीताई साने महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेने बांधलेल्या घरांसाठी मुद्रांक व नोंदणी शुल्कात सवलत देण्यात आली.

वसई विरार शहर महानगरपालिकेला आचोळे (ता. वसई, जि. पालघर) येथे मल्टीस्पेशालिटी रुग्णालयाच्या इमारतीसाठी जमीन देण्यास मंजुरी देण्यात आली. महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा, नाशिक रोड यांना देवळाली (ता. नाशिक) येथे १०५५.२५ चौ.मी. जमीन देण्यास मान्यता देण्यात आली.

गृह आणि गृहनिर्माण विभागाचे निर्णय मुंबईमधील घाटकोपर येथे बेकायदेशीर फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेच्या चौकशीसाठी स्थापन करण्यात आलेल्या न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल स्वीकारण्यात आला तसेच या अहवालातील शिफारशींवर संबंधित विभागांनी एका महिन्यात कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. गृहनिर्माण विभागाने मुंबईतील अंधेरी येथे म्हाडामार्फत सामूहिक पुनर्विकास प्रकल्प राबवण्यास मंजुरी दिली आहे. सरदार वल्लभभाई पटेल नगर (एसव्हीपी नगर) येथील १२२ संस्था आणि ३०७ वैयक्तिक भूखंडांवरील ४,९७३ सदनिकांच्या पुनर्विकासाचा यात समावेश आहे.

## राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्रदान; कलाकारांचा गौरव

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मनोरंजन क्षेत्रात महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या ७१व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची घोषणा यंदा १ ऑगस्ट रोजी करण्यात आली होती. या सर्व विजेत्यांना मंगळवारी (दि.२३) राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले आहे.

नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे हा पुरस्कार वितरण सोहळा झाला. या वेळी शाहरुख खान, विक्रांत मेस्सी, राणी मुखर्जी आदी कलाकारांना गौरविण्यात आले, तर अभिनेते मोहनलाल यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## सायबर सुरक्षा जनजागृती अभियान

**मुंबई : प्रतिनिधी**

डिजिटल सुरक्षिततेला प्रोत्साहन देण्यासाठी व सर्वांसाठी सुरक्षित सायबर व्यवहार निर्माण करण्यासाठी डेटा सिक्युरिटी कौन्सिल ऑफ इंडियामार्फत २५ सप्टेंबर रोजी बॉम्बे स्टॉक एक्सचेंज येथे 'रिंग द बेल फॉर सिक्युरिटी' या अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानातून देशव्यापी सायबर सुरक्षा जनजागृती महिना राबविण्यात येणार आहे.



या अभियानाचे उद्घाटन माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार यांच्या हस्ते होणार असून मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह तसेच गृहमंत्रालय क्रेट-इन, सेबी आणि बीएसई यांचे मान्यवर या वेळी उपस्थित राहणार आहेत.

हे अभियान गृह मंत्रालयाच्या इंडिया सायबरक्राईम कोऑर्डिनेशन सेंटर, इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, क्रेट-इन यांच्या सहकार्याने राबवले जात असून उद्योगक्षेत्रातील भागीदार संस्थांनी या उपक्रमात योगदान दिले आहे.

## निवडक

### गायक जुबीन गर्ग पंचत्वात विलीन; चाहते शोकसागरात

**गुवाहाटी :** सिंगापूरमध्ये स्कुबा डायव्हिंग करताना श्वास गुदमरून मृत्यू पावलेले आसाममधील प्रसिद्ध गायक जुबीन गर्ग यांच्यावर मंगळवारी (दि. २३) कमरकुची येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलिसांनी बंदुकीची सलामी दिल्यानंतर बहीण व भाच्याने पार्थिवाला मुखाग्नी दिला. या वेळी पत्नी गरिमा सैकिया गर्ग यांना अश्रू अनावर झाले. दरम्यान, चाहत्यांनी अंत्यसंस्कारस्थळी जुबीन यांचे सर्वोत्तम गाणे 'मायाबिनी' गाऊन अनोखी श्रद्धांजली अर्पण केली.



### दिग्गज क्रिकेट पंच डिकी बर्ड यांचे निधन

**लंडन :** क्रिकेटविश्वातील महान पंच इंग्लंडचे हेरोल्ड डेनिस बर्ड ऊर्फ 'डिकी बर्ड' यांचे ९२व्या वर्षी निधन झाले. त्यांनी एकूण २६ वर्षांत ३८१ सामन्यांमध्ये पंच म्हणून काम पाहिले. त्यांच्या कारकिर्दीत ते तीन विश्वचषकाच्या फायनलमध्ये पंच होते. ते पंच बनण्यापूर्वी फलंदाज होते.



## चिरनेर जंगल सत्याग्रहाचा उद्या ९५वा स्मृतिदिन

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वपूर्ण ठरलेल्या २५ सप्टेंबर १९३०च्या चिरनेर जंगल सत्याग्रहाचा येत्या गुरुवारी ९५वा वर्धापन दिन आहे. सविनय कायदेभंगाच्या चळवळीत अनेकांनी हौतात्म्य पत्करले होते. त्या हुतात्म्यांची स्मृती जागविण्यासाठी चिरनेर येथे यंदाही कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.



चिरनेर ग्रामपंचायत, रायगड जिल्हा परिषद व उरण पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने चिरनेर येथील हुतात्मा स्मृतीस्तंभाजवळ सकाळी ११ वा. मंत्री भरत गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली आणि खासदार श्रीरंग बारणे यांच्या उपस्थितीत अभिवादन कार्यक्रम होणार आहे. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, उद्योगपती पी.पी. खारपाटील, जिल्हाधिकारी किसन जावळे, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जेएनपीएचे चेअरमन उन्मेश वाघ आदी उपस्थित राहणार आहेत. पोलीस दलातर्फे बंदुकीच्या फैरी झाडून हुतात्म्यांना मानवंदना दिली जाईल.

## पनवेलमध्ये झंकार नवरात्रोत्सव आकर्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


आदिशक्तीच्या शारदीय नवरात्रोत्सवाला भक्तीमय वातावरणात सुरुवात झाली आहे. पनवेल शहरातील मिडलक्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानात दरवर्षीप्रमाणे यंदाही सोसायटी मित्र मंडळाने झंकार नवरात्रोत्सव आयोजित केला आहे. हा उत्सव पनवेलमध्ये आकर्षण ठरत आहे.

येथील देवीची आमदार प्रशांत ठाकूर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते पहिल्या दिवशी विधीवत पूजा करून आरती घेण्यात आली. या वेळी शकुंतला ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, शहर सरचिटणीस रूपेश नागवेकर, उपाध्यक्ष प्रीतम म्हात्रे, मंडळाचे अध्यक्ष उल्हास झुंझारराव, स्वप्नील ठाकूर, स्वाती कोळी, अमेय देशमुख, गौरव चव्हाण, प्रवीण मोरबाळे, जयदीप पाटील, संदीप पाटील, अपूर्व ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले.



या नवरात्रोत्सवात विविध स्पर्धा आणि आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. ग्रुप डान्स स्पर्धेतील विजेत्यांना दोन लाख रुपये रोख आणि एक दुचाकी बक्षीस म्हणून दिली जाईल. याशिवाय दररोज १०० गरबाप्रेमींना आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधी आहे. महाविजेत्याला मोठी स्कूटर बक्षीस मिळणार आहे. हा उत्सव २ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार आहे.

सध्या अनेक ठिकाणी पाऊस पडत असल्याने नवरात्रोत्सवात दांडिया खेळणाऱ्यांचा विशेषत: तरुणाईचा हिरमोड होत आहे, परंतु झंकार नवरात्रोत्सव छपराने आच्छादित असल्याने तेथे पावसाचा व्यत्यय येत नसून गरबा खेळला जात आहे.



# विद्यापीठांनी ज्ञान आणि संशोधनावर अधिक भर द्यावा -केंद्रीय मंत्री गडकरी




**मुंबई : रामप्रहर वृत्त**

आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी होत असेल तर त्याचे महत्त्व अधिक वाढते. त्यादृष्टीने लोकांचे दैनंदिन जगणे सुसह्य करणारे शिक्षण देणे काळाची गरज आहे. विद्यापीठांनी ज्ञान आणि नवीन संशोधनावर अधिक भर द्यावा, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या (एसएनडीटी) ७५ व्या दीक्षान्त समारंभास उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, लोकसभेच्या माजी अध्यक्ष सुमित्रा महाजन, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. उज्वला चक्रदेव, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.


केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, विद्यार्थ्यांना उत्तम व्यक्ती घडवणारे आणि जीवनात यशस्वी करणारे शिक्षण असले पाहिजे. भारताला विश्वगुरु बनवण्यासाठी विविध क्षेत्रात नवीन संशोधन केले पाहिजे. ज्या क्षेत्रांत आपण आयातीवर अवलंबून आहोत, त्या क्षेत्रात नवीन संशोधन करून भविष्यात त्या क्षेत्रात निर्यात वाढवण्यावर भर द्यावा.

सुमित्रा महाजन म्हणाल्या की, ‘एसएनडीटी’ विद्यापीठाने महिलांसाठी शिक्षणाचे विविध मार्ग खुले करून दिले आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी अनेक संकटांवर मात करून जनतेच्या न्याय हक्कासाठी कार्य केले, त्यांचा आदर्श समोर ठेवून कार्य केले पाहिजे. या कार्याचा सन्मान होत असल्याचा अभिमान आहे. असे सांगून त्यांनी महर्षी कर्वे यांच्या सामाजिक कार्याचीही आठवण करून दिली.

सुमित्रा महाजन यांना त्यांच्या सार्वजनिक जीवनातील व महिलांच्या सक्षमीकरणातील उल्लेखनीय कार्याबद्दल ‘डॉक्टर ऑफ लिटरेचर’ (डी.लिट्.) ही मानद पदवी प्रदान करण्यात आली. तसेच या दीक्षान्त समारंभात पदवी, पदव्युत्तर, पदविका विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करून संशोधन व नवोन्मेष क्षेत्रात योगदान दिलेल्या डॉक्टरेट पदवीधारकांचा विशेष सत्कार करण्यात आला.

या वर्षी एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाला नॅककडून ‘ए’ श्रेणी प्राप्त झाली असून अध्यापन, संशोधन, सुशासन व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी विद्यापीठाच्या वतीने अनेक शैक्षणिक उपक्रम हाती घेण्यात आल्याची माहिती विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. उज्वला चक्रदेव यांनी प्रास्तविक भाषणात दिली.

# सरकारकडून मत्स्यशेतकऱ्यांच्या मागण्यांना हिरवा कंदील



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील मत्स्यशेतकऱ्यांच्य समस्या आणि त्यांचे सक्षमीकरण यासाठी मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी मंत्रालयात विस्तृत चर्चासत्र घेतले होते त्यावेळी त्यांनी मत्स्यशेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत सरकार सकारात्मक असून लवकरच त्यांच्या मागण्यांबाबत योग्य तो निर्णय घेऊ असे सांगितले.

मत्स्यव्यवसाय क्षेत्राला अधिक चालना मिळावी म्हणून राज्य शासनाने बजेट वाढवण्याची गरज आहे. मत्स्यव्यवसाय हा किनारपट्टीवरील हजारो कुटुंबांचा प्रमुख उदरनिर्वाह आहे. त्यामुळे या क्षेत्रातील मूलभूत सुविधा, बाजारपेठ आणि प्रक्रिया उद्योग वाढवण्यासाठी सरकारकडून अधिक निधी आवश्यक आहे. आम्ही मुख्यमंत्र्यांकडे बजेट वाढवून देण्याची विनंती केली आहे.

मुख्यमंत्री जलसंपदा योजना जानेवारी २०२६ पासून राज्यात राबवण्यात येणार असून मत्स्यव्यवसायाशी निगडित पायाभूत सुविधा उभारणे, मत्स्य बंदरांचा दर्जा उंचावणे आणि जलसंपदांचे शाश्वत व्यवस्थापन हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट असेल. तसेच एकूण २६ नवीन योजना पुढील आर्थिक वर्षात अंमलात येणार असल्याची माहिती राणे यांनी दिली.

चर्चासत्रात उपस्थित मत्स्यशेतकऱ्यांनी डिझेल सबसिडी, मासळीच्या कोल्ड स्टोरेजची उभारणी, मच्छीमार बांधवांचे विमा संरक्षण, तसेच किनारपट्टी संरक्षण भिंती यासंबंधी मागण्या मांडल्या असता राणे यांनी मत्स्यशेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले तसेच त्यांचे प्रश्न व सूचना थेट विभागाकडे पाठवण्याची सोय उपलब्ध करून दिली जाईल असेही सांगितले.

# एक दिवस, एक साथ, एक तास उपक्रमात नागरिकांनी सहभागी व्हावे; मनपाचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये स्वच्छता ही सेवा २०२५ अंतर्गत एक दिवस, एक साथ, एक तास ही नागरिकांच्या नेतृत्वाखाली राबविली जाणार आहे. ही देशव्यापी स्वच्छता मोहीम दिनांक २५ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रभाग स्तरावर राबविण्यात येणार आहे.

आपल्या जवळील सार्वजनिक ठिकाणी आयोजित स्वच्छता मोहिमेमध्ये नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे. या स्वच्छता मोहिमेमध्ये सहभागी होण्यासाठी पुढील लिंक चा वापर करावा. https://swachhatahiseva.gov.in/citizen

# श्रीवर्धनमध्ये पावसामुळे पर्यटन व्यवसायावर मंदीचे सावट

**श्रीवर्धन : बातमीदार**

यावर्षी मे महिन्याच्या २० तारखेलाच कोकणामध्ये पावसाने सुरुवात केली. त्यामुळे पर्यटन व्यावसायिकांचा जवळजवळ एक महिना वाया गेला होता. नाहीतर साधारण जून महिन्याच्या दहा तारखेला पावसाला सुरुवात होते. तोपर्यंत पर्यटन चांगल्या प्रमाणावर सुरू असते. त्यामुळे या ठिकाणच्या व्यवसायिकांना देखील चांगला रोजगार उपलब्ध होतो. परंतु यावर्षी पावसाने लवकर सुरुवात केल्याने पाऊस लवकर थांबेल, अशी आशा सर्व पर्यटन व्यवसायिकांना होती. परंतु अद्याप देखील सप्टेंबर महिन्याची २४ तारीख उजाडली तरी पाऊस थांबायचे नाव घेईना.

त्यामुळे पर्यटकांचे येण्याचे प्रमाण अत्यंत कमी झाल्याचे पाहायला मिळते. श्रीवर्धन तालुक्यात प्रामुख्याने मच्छीमारी व पर्यटन हे व्यवसाय नागरिकांच्या उपजीविकेचे साधन आहेत. एक ऑगस्ट रोजी मच्छीमारी वरील शासकीय बंदी उठल्याने मच्छीमारीला सुरुवात करण्यात आली होती. परंतु त्यानंतर वातावरणात पुन्हा बदल होऊन समुद्र खवळल्यामुळे मच्छीमारी बंद होती. परंतु मागील आठ ते दहा दिवसांपासून चांगल्या प्रमाणात मच्छीमारी सुरू आहे. मागील शनिवारी देखील सर्वपित्री अमावस्या असल्यामुळे पर्यटकांनी घराबाहेर पडणे टाळले.

पर्यायाने श्रीवर्धन तालुक्यात अत्यंत कमी प्रमाणात पर्यटक आले. दरवर्षी साधारणपणे नवरात्रोत्सवाच्या काळात पाऊस संपत आलेला असतो. परंतु या वेळेला नवरात्रोत्सव सुरू झाल्यानंतरही मुसळधार पाऊस कोसळत असल्यामुळे गरबा नृत्य करणाऱ्या भाविकांमध्ये काहीसा नाराजीचा सूर पाहायला मिळतो. श्रीवर्धन तालुक्यातील सर्वच पर्यटन व्यवसायिकांनी आपापली हॉटेल्स, रिसॉर्ट पूर्णपणे सज्ज ठेवले आहेत. फक्त आता वाट बघायची आहे ती पर्यटक येण्याची.

श्रीवर्धन तालुक्यातील श्रीवर्धनचा समुद्र किनारा, त्याचप्रमाणे हरिहरेश्वर चे हरिहरेश्वर, काळभैरव मंदिर, दिवेआगरचा समुद्र किनारा व त्या ठिकाणी असलेले सोन्याच्या गणपतीचे मंदिर हे पर्यटकांचे विशेष आकर्षण आहे. या महिन्याच्या अखेरीस पर्यटन व्यवसाय चांगल्या प्रकारे सुरू होईल असा विश्वास पर्यटन व्यवसायिकांमधून व्यक्त केला जात आहे.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात हिंदी दिवस साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत षिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात दि. १७ सप्टेंबर या दिवशी हिंदी दिवस उत्साही वातावरणात पार पडला. हिंदी दिवसाच्या निमित्ताने कविता वाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांनी विविध हिंदी कवींवरील तसेच स्वत:च्या रचनेतील कविता सादर करुन सर्व उपस्थितांची दाद मिळवली. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्कट भावना, योग्य शब्दोच्चार आणि प्रभावी सादरीकरणातून हिंदी भाषेचे सौंदर्य खुलवून दाखवले. प्राचार्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रतिभेचे कौतुक करुन त्यांना प्रोत्साहन दिले. त्याचबरोबर प्राचार्या निशा मॅम यांनी स्वयंम –रचित कविताही सादर करुन कार्यक्रमात बहार आणली. हिंदी भाषेचे महत्व अधोरेखित करणारा हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला.



# खालापूर भाजयुमो आणि लायन्स क्लबतर्फे आरोग्य शिबिर

**चौक : प्रतिनिधी**

लायन्स क्लब खालापूर व भारतीय जनता पार्टी खालापूर व युवा मोर्चा आघाडी खालापूर यांच्या संयुक्त विद्यमाने वावोशी आरोग्य केंद्र येथे महाआरोग्य शिबीर राबविण्यात आले. ग्रामीण भागातील ३०० पेक्षा जास्त लोकांनी सहभाग घेऊन आरोग्य तपासणी करून घेतली.

यामध्ये ३० मोतीबिंदू रुग्ण आढळले त्यांचेवर मोफत शस्त्रक्रिया नायर हॉस्पिटल पनवेल येथे करण्यात येईल.७० लोकांना मोफत चष्मा वाटप करण्यात आले.यावेळी अनेकांनी रक्तदान केले. यावेळी रक्तदाब,मधुमेह व हाडाची तपासणी करण्यात आली. लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



सदर कार्यक्रमास भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड अध्यक्ष अविनाश कोळी, भाजप नेते नरेश पाटील,लायन अध्यक्ष लायन किशोर पाटील, लायन अशोक पाटील,हरिभाऊ जाधव,विक्रम साबळे, शिवानी ताई जंगम, तसेच ऋषी चालके, यशवंत साबळे,काशिनाथ पारठे, सनी यादव सौ. श्वेताताई मनवे,राकेश जाधव,नागेश पाटील,संजय देशमुख, बुरुमकर महाराज,विठ्ठल मोरे, सरपंच उपसरपंच व सदस्य व सर्व कार्यकर्ते उपस्थित होते. परिसरातील अनेक मान्यवर व्यक्तींनी सदर आरोग्य शिबिरास भेट दिली. मेडिकव्हर हॉस्पिटल खारघर, MGM² हॉस्पिटल कामोठे तसेच नायर हॉस्पिटल नवीन पनवेल येथील सर्व डॉक्टर व कर्मचारी वृंद व लायन ज्योती देशमाने व लायन श्री नागेश देशमाने यांनी मोलाचे सहकार्य केले.

## पान १ वरुन

# राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना २२१५ कोटींची मदत

शेतकऱ्यांचे जे नुकसान झाले होते त्याचे पंचनामे करून मदतीचे आदेश दिले आहेत. ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांना दोन हजार कोटींहून अधिक मदत करण्याचे आदेश दिले आहेत. शेतकऱ्यांच्या खात्यात पुढच्या आठ ते दहा दिवसांत पैसे जमा होतील. अद्यापही हे थांबलेले नाही. पंचनामे करून मदत जाहीर करण्याची प्रक्रिया निरंतरपणे चालू राहणार असून यापुढेही मदत निधीचे जीआर वितरीत केले जातील, असे मुख्यमंत्री म्हणाले.

मृत्यू किंवा दुर्दैवी घटना घडल्यास जिल्हाधिकारी स्तरावर मदतीचे आदेश दिले आहेत. राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठिशी असून घरे, शेती आणि जनावरांचे जिथे नुकसान झाले आहे तिथे आवश्यक त्या ठिकाणी निकषामध्ये शिथिलता आणून मदत केली जाईल. स्थानिक पातळीवरही नुकसानग्रस्तांना त्वरित दिलासा देण्यासाठी प्रशासनाला पूर्ण सूट देण्यात आली आहे. निधीची कमतरता भासणार नाही याची खबरदारी घेण्यात आली आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. अतिवृष्टीमुळे उद्ध्वस्त होणाऱ्या शेतकऱ्याला मदत करण्यावर आमचा भर आहे, असे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

जी काही नियमांमध्ये आहे ती मदत आम्ही देणे सुरु केली आहे. केंद्र सरकारकडे मदतीचा प्रस्ताव पाठवण्यात येईल. केंद्राची मदत मिळेलच, पण राज्याने तातडीने मदत देणे प्रारंभ केले आहे. शेतकऱ्यांना तातडीचा दिलासा देण्यासाठी राज्य सरकार कुठेही कमी पडणार नाही. तातडीची मदतही आपण करतो आहे. ज्यांचे स्थलांतर केले आहे त्यांच्या राहण्याची, जेवणाची सगळी व्यवस्था सरकारने केली आहे. काही भागांत अजूनही पाणी ओसरलेले नसल्याने स्थलांतरित नागरिकांना घरी परतता येत नाही. त्यांच्यासाठी सर्व व्यवस्था सरकार पुरवत आहे. कुणीही राजकारण करू नये, असेही मुख्यमंत्र्यांनी या वेळी म्हटले.

दरम्यान, हवामान खात्याने २७, २८ सप्टेंबरदरम्यान पुन्हा अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. यासाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज असून नागरिक आणि शेतकऱ्यांनी आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन सरकारने केले आहे.

# व्यापाऱ्याला तीन लाख ८४ हजारांचा गंडा

## खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

व्यावसायिकाकडून घेतलेल्या गव्हाची रक्कम न देता तीन लाख ८४ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी धनजी पठाई भानुशाली (रा. साई पॅलेस, विचुंबे) यांच्याविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

एकनाथ कडबाने हे नाशिक, सिन्नर येथे राहतात. त्यांची नाशिक ॲग्रो प्रॉडक्ट नावाची कंपनी आहे. ते गहू आणि आटा विक्री करतात. त्यांना धनजी भानुशाली यांनी संदेश पाठवून उसरली खुर्द, पनवेल येथे त्यांची कंपनी असून, बारा टनाच्या गव्हाची आवश्यकता असल्याचे सांगितले. गव्हाचा प्रतिकिलो भाव ३२ रुपये ठरवून गाडी पोहोचल्यानंतर ऑनलाईन पैसे देणार असल्याचे सांगितले, मात्र एकनाथ यांना १४ सप्टेंबर रोजी धनजी भानुशाली यांनी गोडाऊनकडे जाणारा रस्ता बंद असल्याने ट्रक आसुडगाव येथील बस डेपोजवळील इंडियन पेट्रोल पंप येथे पार्क करा, असे सांगितले. त्यानुसार त्यांनी त्या ठिकाणी गाडी उभी केली असता, भानुशाली यांच्या माणसांनी गाड्यांमध्ये गहू साठा भरून ते साई पॅलेस विचुंबे येथे नेले.

दरम्यान, एकनाथ यांनी गव्हाच्या रकमेबाबत विचारले असता, भानुशाली यांनी तांत्रिक समस्येचे कारण देत ही रक्कम आज देऊ शकणार नसल्याचे सांगत आता धनादेश देतो, तो घेऊन उद्या माझ्याकडे या, मी तुम्हाला आरटीजीएस करून रक्कम पाठवतो, असे सांगितले. त्यानुसार एकनाथ कडबाने यांचे प्रतिनिधी १५ सप्टेंबर रोजी विचुंबे येथील गोडाऊनला गेले असता, धनजी भानुशाली तेथे नव्हता तसेच त्याचा मोबाईलही बंद असल्याचे समजले.

त्यावर त्यांनी भानुशालीने दिलेला तीन लाख ८४ हजारांचा चेक बँकेत जमा करण्यास गेले असता, त्यांच्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर एकनाथ यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

# वासांबे ग्रामपंचायतीमध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायतीच्या शिवांजली इमारतीच्या कार्यालयामध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान शुभारंभ या कार्यक्रमांतर्गत विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत ग्रामपंचायत हद्दीत मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान राबविण्याचे आवाहन करण्यात आले.



या वेळी सरपंच उमा संदीप मुंढे, उपसरपंच दीपक चंद्रकांत कांबळे, ग्रामपंचायत अधिकारी वैभव बाळकृष्ण पाटील सर्व ग्रामपंचायत सदस्य व सदस्या, क्षेत्रीय अधिकारी अनिल यशवंत जाधव , मंडळ अधिकारी श्रीनिवास खेडकर, तलाठी श्री लाटे व तेजस देशमुख, अंगणवाडी सेविका, राजीप शाळेचे मुख्याध्यापक व मुख्याध्यापिका, बचत गट अध्यक्ष ,सीआरपी , आशा वर्कर , ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# महाराष्ट्राची विजेची गरज पूर्ण करण्यासाठी महानिर्मिती सक्षम

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

व्हिजन विकसित महाराष्ट्र २०४७ अनुरूप राज्याची भविष्यातील विजेची गरज लक्षात घेत महानिर्मितीने पर्यावरणपूरक वीज निर्मिती प्रकल्प उभारत आपली स्थापित क्षमता वृद्धी करण्याचे नियोजन केले आहे. यामध्ये प्रत्येक अभियंत्याने निरंतर कौशल्य विकासाद्वारे स्पर्धात्मक वीज निर्मितीकरिता सज्ज राहणे गरजेचे असल्याचे महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.) यांनी अभियंत्याना संबोधित करताना आवाहन केले, ते अभियंता दिनानिमित्त सांघिक कार्यालय प्रकाशगड येथे महानिर्मितीतर्फे आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

महानिर्मितीच्या प्रशिक्षण केंद्रातर्फे अभियंता दिनानिमित्त तांत्रिक पेपर, प्रश्नमंजूषा तसेच केस स्टडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कनिष्ठ अभियंता ते कार्यकारी अभियंता संवर्गातील सुमारे २०० अभियंते यामध्ये सहभागी झाले होते. यातील सर्वोत्तम तीन स्पर्धकांना सन्मानित करण्यात आले. डायरेक्टर ऑफ स्टीम बॉयलर, महाराष्ट्र शासन यांचे तर्फे घेण्यात आलेल्या बॉयलर प्रोफेशियन्सी परीक्षेमध्ये राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबद्दल उपकार्यकारी अभियंता वर्षा सोनकुसरे यांना सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. होते . संचालक संजय मारुडकर, संचालक अभय हरणे, संचालक मनेष वाघीरकर उपस्थित होते.



# वडाळे तलावाजवळ रोड रोमियोंना दणका

## भाजपच्या प्रयत्नातून पोलीस प्रशासनाची कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील वडाळे तलाव परिसरात वेगाने गाडी चालवणे, मोठ्या आवाजात हॉर्न वाजवणे, दुचाकींचे स्टंट करणारे अशा रोड रोमियोंना भाजपच्या उमेश इनामदार यांच्या प्रयत्नातून पोलीस प्रशासनाकडून चांगलीच चपराक बसवली आहे. या रोड रोमियोंकडून दंड वसूल करत काहींना कान पकडून माफी मागायला लावली.



शहरातील वडाळे तलाव परिसरात पनवेल आणि आसपासचे नागरिक विरंगुळा म्हणून तसेच मॉर्निंग वॉक साठी फिरायला येत असतात. याच ठिकाणी शाळा आणि महाविद्यालयदेखील आहे. या भागात रोड रोमियोंचा वावर वाढला होता. वेगाने गाडी चालवणे, जोराने हॉर्न वाजवणे, स्टंट करणे आणि मुलींची छेडछाड असे प्रकार वाढले होते. याबाबतची तक्रार अनेकदा ज्येष्ठ नागरिक तसेच महिला वर्ग करत होते. तेव्हा भाजपचे उमेश इनामदार यांनी या बाबीकडे लक्ष टाकले. त्यांनी पोलीस प्रशासनाला याबाबत कार्यवाही करण्याची विनंती केली. तेव्हा पोलीस प्रशासनाचे वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक औदुंबर पाटील आणि शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक शाकीर पटेल यांच्यासहीत उमेश इनामदार यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. तेव्हा काही युवक वेगात गाडी चालवताना, गाड्यांचे स्टंट करताना तसेच हॉर्न जोरात वाजवताना आणि दुचाकीवर ट्रिपल सीट आढळून आले. पोलिसांनी दंडात्मक कारवाई केली तर काहींना कान पकडून माफी मागायला लावली.

ही कारवाई म्हणजे चपराक असल्याचे बोलले जात आहे. या वेळी उमेश इनामदार यांच्या सोबत भाजपचे शहर उपाध्यक्ष केदार भगत आणि सचिन नाझरे हे देखील उपस्थित होते.

# गव्हाण येथे स्वस्थ नारी, सशक्त परिवार आरोग्य शिबिर उत्साहात





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसापासून तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत सेवा पंधरवड्या अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने, रायगड जिल्हा परिषदेच्या सहकार्याने मंगळवारी (दि.२३) स्वस्थ नारी, सशक्त परिवार या अभियाना अंतर्गत आरोग्य शिबिराचे आयोजन गव्हाण येथे करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्घाटन वहाळ येथील साई संस्थांचे अध्यक्ष रवीशेठ पाटील यांच्या हस्ते झाले. दरम्यान, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी या कार्यक्रमाला सदीच्छा भेट दिली.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश हा महिलांच्या आरोग्य तपासणी, उपचार आणि पोषणावर विशेष भर देणे आहे. या शिबिरात गर्भवती महिला, स्तनदा माता आणि किशोरवयीन मुलींसह सर्व महिलांसाठी सर्वसमावेशक आरोग्य तपासणी, रक्तदाब, मधुमेह आणि हिमोग्लोबिन तपासणीचा समावेश होता. तसेच पौष्टिक पूरक आणि आहाराबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाला गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, माजी सदस्या योगीता भगत, समीर आंग्रे, सी.एल.ठाकूर, हेमंत ठाकूर, जयवंत देशमुख, निलेश खारकर, प्रकाश पाटील, सुहास भगत, दीपक गोंधळी, विजय देशमुख, धीरज ओवळेकर, मच्छींद्र कोळी, निकीता खारकर, प्रकाश जितेकर, राकेश गायकवाड, गजानन पाटील, रुपेश गायकवाड, शनिकुमार पाटील, रविंद्र पाटील, रामेश्वर आंग्रे, रमेश भोईर, उषा देशमुख, सुजाता पाटील, प्रणय कडू, अमर म्हात्रे, मदन पाटील, प्रणय कोळी, माजी नगरसेवक अरुणकुमार भगत, ग्रामसेवक विजय राठोड, मनिषा गायकवाड, किर्ती कुटे, बबन राठोड, नवनाथ शेंडगे, अपर्णा खेडेकर, कविता खारकर, अस्मिता बोंबालकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सीकेटी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

### कला संघटनेचा स्तुत्य उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या मराठी विभाग आणि कला संघटन यांच्या संयुक्त उपक्रमातून शनिवारी (दि.२०) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांची गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने आयकर आयुक्त (आंतरराष्ट्रीय कराधान) संजय देशमुख यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.



स्पर्धा परीक्षा ही सुवर्णसंधी आहेच, मात्र त्याचबरोबर ती समाजाची सेवा आहे. मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेल्या, प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तुंग यश मिळवायचे असेल, तर त्यांनी या परीक्षेतील यशाचे तंत्र समजून घ्यावे, समाजासाठी समरसून काम करावे, वेळेचे व्यवस्थापन करून अभ्यास करावा, तसेच केवळ एकाच पर्यायाच्या मागे न धावता आपला प्लॅन बी अर्थात पर्यायी मार्ग तयार ठेवावा, अशा शब्दांत संजयजी देशमुख यांनी विद्यार्थ्यांना यशाचा कानमंत्र दिला. आपल्या प्रशासकीय सेवेच्या अनुभवातून अनेक आंतरराष्ट्रीय संदर्भ देत संजय देशमुख यांनी विद्यार्थ्यांसोबत मनमोकळा संवाद साधला त्याचबरोबर त्यांच्या प्रश्नांना उत्तरेही दिली.

शासकीय नोकऱ्यांमध्ये विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने महाविद्यालयात अद्ययावत ग्रंथालय तसेच सी. डी. देशमुख स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र उपलब्ध करून देण्यात आले आहे, त्याचा सर्व विद्यार्थ्यांनी लाभ करून घ्यावा, असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. एस. के. पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकात विद्यार्थ्यांना केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय मराठी विभाग प्रमुख आणि कला संघटनेचे अध्यक्ष प्रा. एम. एम. अंबुलगेकर यांनी करून दिला.

मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाल्यानंतर हिंदी विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. भूषण घरत यांनी ईशस्तवन आणि कला शाखेच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सीडी देशमुख स्पर्धा परीक्षा केंद्राचे प्रमुख संजय हिरेमठ यांचे विशेष सहकार्य लाभले.

कला संघटनेच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला कला विभागातील सर्व मान्यवर प्राध्यापक आवर्जून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागाच्या सहाय्यक प्राध्यापक नम्रता कडू यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन कला शाखेचे प्रमुख प्रा. डॉ. बी. एस. पाटील यांनी केले.

# मंगळसूत्र खेचून चोरटे पसार

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून मोटारसायकलवरून आलेले दोन चोरटे पसार झाल्याची घटना पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली.

भारती दवे (वय ६३) या साईनगर रोड, पनवेल येथे राहतात. त्या येथील सहस्त्रबुद्धे हॉस्पिटलकडून साईनगर रोडने घराच्या दिशेने जात असताना दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांपैकी एकाने त्यांच्या गळ्यातील दोन तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र खेचून दुचाकीवरून ते भरधाव वेगात पसार झाले.

दरम्यान, त्यांनी आरडाओरडा केला, मात्र त्याचा काहीच उपयोग झाला नाही. त्यानंतर भारती दवे यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात धाव घेत या प्रकरणी तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी दोन अज्ञात चोरट्यां विरोधात गुन्हा नोंद केला आहे.



**पनवेल :** खांदा कॉलनी एच टाईप सोसाइटी सेक्टर ६च्या गार्डनमध्ये बेकायदा मोबाईल टॉवरचे काम चालू होते. ते स्थानिक नगरसेवकांच्या सतर्कतेमुळे बंद पाडण्यात आले आणि सर्व साहित्य पनवेल महापालिकेने जप्त केले. या वेळी माजी उपमहापौर सीता पाटील, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, भाजप नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, सरचिटणीस भिमराव पोवार, श्री. मुंडे श्री. सोनवणे, श्री. महापूरकर, यांच्यासह सोसायटीचे रहिवासी श्री. जंगम, डॉ. सतीश विसपुते, महिला आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'सीकेटी'चे निर्भय म्हात्रे, सम्यक जाधव आयटी जीनियस परीक्षेत टॉप १८मध्ये

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात १० ते १२ ऑगस्ट रोजी सर्व एमकेसीएल केंद्रावर 'आयटी जीनियस एक्झाम 'ऑनलाईन घेण्यात आली होती. या परीक्षेत पनवेल तालुक्यातील २२०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता तसेच ही परीक्षा पूर्णपणे आर्टिफिशियल इंटेलिजन्स, एमएससीआयटी, बेसिक नॉलेज ऑफ कॉम्प्युटर या विषयांवर आधारित होती. नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील एकूण १७८ विद्यार्थी या परीक्षेस बसले होते.

यामध्ये निर्भय संतोष म्हात्रे (बारावी सायन्स) व सम्यक मनेष जाधव (बारावी सायन्स) हे दोन विद्यार्थी टॉप १८मध्ये आले आहेत. या दोन्ही विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



# पनवेल तालुका पत्रकार मंचतर्फे योगिनी वैदू यांचा सत्कार

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या वतीने यंदाच्या वर्षी रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने दिला जाणारा आदर्श शिक्षका पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल योगिनी वैदू यांचा सत्कार करण्यात आला. प्रतिवर्षी शिक्षक दिनाच्या निमित्ताने जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून एका आदर्श शिक्षकाची निवड केली जाते. सन २०२५ - २६ या वर्षासाठी पनवेल तालुक्यातून योगिनी वैदू यांना आदर्श शिक्षिका म्हणून पुरस्कार जाहीर झाल्याची नुकतीच घोषणा करण्यात आली होती. पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे सल्लागार तथा ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांच्या कार्यालयात मंगळवारी सत्कार सोहळा पार पडला. योगिनी वैदू या रायगड जिल्हा परिषदेच्या तळोजे पंचनद येथील शाळेमध्ये उपशिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. कोकण मराठी साहित्य परिषदेसह अनेक सामाजिक संस्थांतून त्या सक्रिय असतात. शाळाबाह्य मुलांकरता राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या चळवळीमध्येदेखील त्या अग्रेसर आहेत. या सत्कार समारंभाला पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे सल्लागार माधव पाटील, अध्यक्ष मंदार दोंदे, खजिनदार संजय कदम, सरचिटणीस हरेश साठे, प्रवीण मोहोकर, राजू गाडे, भरत कुमार कांबळे उपस्थित होते.



# पनवेलमध्ये महाराष्ट्रातील ९० श्रीसंघांचे संमेलन

**पनवेल : वार्ताहर**

ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स, मुंबई-पुणे प्रांत, पंचम झोन श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ पनवेल व मेवाड़ श्रावक संघ यांच्या संयुक्त तत्वावधानात पनवेल येथील बँक्विट हॉलमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील श्रीसंघांचे भव्य मिलन संमेलन आयोजित करण्यात आले. संमेलन श्रमणसंघीय युवाचार्य महेंद्र ऋषीजी म.यांच्या पावन सान्निध्यात दोन सत्रांमध्ये पार पडले. महाराष्ट्रभरातून ९० पेक्षा जास्त संघांचे सुमारे ४०० पदाधिकारी व सदस्य सक्रिय चर्चेत व निर्णय प्रक्रियेत सहभागी झाले.



कार्यक्रमाच्या यशात वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ पनवेल व चातुर्मास आयोजन समितीचे अध्यक्ष राजेश बांठिया, राजेंद्र बांठिया, नितीन मुनोत, संतोष मुनोत, शैलेन्द्र खेरोडिया, मनोज बांठिया, बिपिन मुनोथ, जयंतीलाल परमार, मदनलाल चपलोत, ललित चंडालिया, रणजीत कांकरेजा, अशोक बोहरा, शीतल बांठिया, महावीर सोलंकी, प्रकाश कर्नावट, जितेंद्र बालड, रितेश मुनोत, विजय कुमठ, विजय श्रीमाल, रिखब बनवट, गौरव बांठिया, ऋषभ बांठिया, हस्तीमल कराड यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

# सीकेटी महाविद्यालयात लोगो डिझाईन आणि अतिथी व्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय (स्वायत्त) येथे विज्ञान संघटना यांच्या मार्फत 'जीवनशैलीतून तरुणांना आकार देणे' या विषयावर अतिथी व्याख्यान व तंत्रज्ञानाशी सुरक्षित विज्ञान व हरित ऊर्जा, अक्षय ऊर्जा, जीवनासाठी एआय या विषयावर लोगो डिझाइन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून महात्मा फुले आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालायचे प्रा. डॉ. संतोष पी. सुपनेकर हे उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, विज्ञान शाखेच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर, प्राणीशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ.एम.ए.म्हात्रे व विज्ञान संघटनेच्या प्रमुख प्रा. डॉ. वाय. एस. मुनीव यांनी उपस्थिती दर्शविली.त्याचबरोबर जैवतंत्रज्ञान प्रा. एम. डी. वैशंपायन यांनी प्रमुख पाहुणे डॉ. संतोष पी. सुपनेकर यांचा परिचय उपस्थितांना करून दिला.

प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. संतोष पी. सुपनेकर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना जनरेशन- झेड चा तुमच्या जीवनशैलीवर होणारा परिणाम तसेच पारंपारिक आणि आधुनिक अन्नाचा आरोग्यावर काय परिणाम होतो. त्याचबरोबर सोशल मीडियाचा जनरेशन-झेडवर होणारा दुष्परिणाम या विषयी माहिती दिली. तसेच तुम्ही मार्केटिंग आणि उद्योजकतेसाठी सोशल मीडियाचा वापर करू शकता, असाविद्यार्थ्यांना उपदेश केला. कार्यक्रमामध्ये १२६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राणीशास्त्र विभागाच्या विद्यार्थिनी साक्षी धनावडे आणि श्रेया जोशी यांनी केले. तसेच माहिती तंत्रज्ञान विभागाच्या प्रा. एस. डी. चांडवेकर यांनी आभार मानले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयातर्फे वाहनचालकांसाठी नेत्र तपासणी शिबिर

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त उपक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षनिमित्ताने जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अपोलो हॉस्पिटल बेलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि.२३) सेक्टर, १९ खारघर येथे वाहन चालकांसाठी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केले होते.





या शिबिराचे उद्दिष्ट वाहन चालकांचे दृष्टी स्वास्थ्य तपासणे व त्यांच्या नेत्र विकारांचे निदान करणे हे होते. या उपक्रमात खारघर येथील सुमारे १२० वाहन चालकांच्या वेगवेगळ्या मोफत तपासण्या करण्यात आल्या तसेच या नेत्र शिबिरात अपोलो हॉस्पिटलचे तज्ज्ञ डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी सेवा दिली तसेच शिबिरादरम्यान लाभार्थ्यांना आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या.

या उपक्रमामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेतला व आरोग्यविषयक जनजागृती केली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख यांनी शिबिरामध्ये उपस्थिती दर्शवली आणि स्वतः विविध चाचण्यांचा लाभ घेतला व शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, सीडीसी मेंबर दीपक शिंदे, भाजप कार्यकर्ते प्रभाकर जोशी यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले व शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या तसेच गुरु ठाकूर, अध्यक्ष श्री सिद्धिविनायक उत्सव मित्र मंडळ खारघर, फुलाजी ठाकूर चिटणीस खारघर शहर भाजपा, प्रताप बाबेल, अशोक अच्छा, हितेश पाठक तसेच सिद्धिविनायक मित्रमंडळातील इतर सर्व सदस्य यांनी नेत्र शिबिरासाठी उपस्थित राहून सहकार्य केले.

हा सामाजिक उपक्रम महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक प्रा. प्रथमेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आला. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सर्व स्वयंसेवक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सदस्य परेश ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे यांनी हा उपक्रम यशस्वी रित्या राबविल्याबद्दल रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील सर्व शिक्षक, कर्मचारी विद्यार्थी यांचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

## संपादकीय


# पावसाचे भीषण थैमान

आजवर दुष्काळग्रस्त अशी ओळख असलेल्या मराठवाड्यात सध्या जोरदार पावसाने हाहाकार माजवला आहे. बीड, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यांत भयावह पूरस्थिती निर्माण झाली असून आणखी काही दिवस पावसाचा इशारा हवामान विभागाने दिल्याने लोक भयभीत झाले आहेत. सरकारी मदतीसोबतच राज्यभरातून पूरग्रस्तांपर्यंत मदत पोहोचण्याची गरज आहे.

**पूरस्थितीने गेल्या दोन दिवसांत मराठवाड्यात आठ जणांचा बळी घेतला असून १५०हून अधिक जनावरे दगावली आहेत. अनेक ठिकाणी बचावकार्य सुरू असून बीड जिल्ह्याने कधीही अशाप्रकारचा पाऊस पाहिलेला नव्हता असे तेथील वयोवृद्ध सांगतात. मराठवाड्यात १ जूनपासून आतापर्यंत सरासरीच्या १२४ टक्के पाऊस पडल्याची नोंद आहे. एकट्या सप्टेंबर महिन्यात मराठवाड्यात १६५ टक्के पाऊस झाला आहे. शेतकऱ्यांनी राबराबून घेतलेले कुठलेही पीक त्यांच्या हाताला लागणार नाही अशी एकंदर परिस्थिती सध्या तेथे दिसते आहे. घरात चिखल, पिके जमीनदोस्त आणि जनावरे दगावलेली अशी विषण्ण करणारी परिस्थिती काही कुटुंबांवर ओढवलेली दिसते. दरम्यान, ३१ लाख शेतकऱ्यांसाठी आर्थिक मदतीचा जीआर काढल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिली. सरकारकडून ओला दुष्काळ असा उल्लेख केला गेला नसल्याबद्दल विरोधकांनी ओरड सुरू केली आहे. वास्तविक मराठवाड्यातील परिस्थिती पाहता विरोधकांनी या विषयावरून राजकारण करण्याऐवजी मदतकार्यात उतरायला हवे आहे. विरोधकांच्या राजकारणाकडे आपण लक्ष देणार नाही, पूरग्रस्तांना सर्वतोपरि मदत करणार असे उत्तर मुख्यमंत्र्यांनी दिले हे योग्यच आहे. मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार सत्ताधारी पक्षांशी संबंधित अनेक नेतेमंडळी सध्या पूरस्थितीचा आढावा घेण्यासाठी गावागावांत हिंडू लागली आहेत. या भीषण संकटातून सावरायचे कसे असा मोठा प्रश्न लोकांसमोर असून नेतेमंडळी व प्रशासनानेही त्यांना धीर देण्याची गरज आहे. मराठवाड्यात अनेक पूरग्रस्त तालुक्यांमध्ये शेतजमिनी खरडून गेल्या असून पिके पूर्णपणे पाण्यात गेली आहेत. तेथे सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून सुरू असलेल्या पावसामुळे सुमारे पाच हजारहून अधिक गावांतील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. यात सोयाबीन, तूर, कापूस या पिकांचे आणि फळबागांचे मोठे नुकसान झाल्याचे समजते. बीड, धाराशिव, परभणी या जिल्ह्यांमध्ये गेले दोन दिवस पावसाने थैमान घातले असून बीड, सोलापूर, परभणी आणि जळगाव या जिल्ह्यांतील धरणेही ओसंडून वाहात असल्यामुळे नदीकाठच्या लोकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. बीड जिल्ह्यात ग्रामीण भागाबरोबरच शहरांना सुद्धा पावसाने झोडपून काढले आहे. बीड शहरातील अनेक दुकाने अर्धीअधिक पुराच्या पाण्याखाली गेल्याचे समोर आले आहे. बुलढाण्यातही पावसाचा असाच कहर पहायला मिळाला तर धाराशिवच्या भूम तालुक्यातील तीन गावांत जीव वाचवण्यासाठी लोकांना घरांवर चढून बसावे लागले. अशा सहा कुटुंबांतील १४ जणांना पुराच्या पाण्यातून हेलिकॉप्टरद्वारे सुरक्षित बाहेर काढण्यात आले. या तालुक्यात घरे, शाळा सारे काही पावसाच्या पाण्याखाली गेले असून शेतकऱ्यांनी साठवण म्हणून ठेवलेले धान्यही भिजून वा वाहून गेले आहे. घरातील साऱ्याच गोष्टींची पुराच्या पाण्याने दैना झाल्याने लोक हवालदिल झाले आहेत. नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी उत्तरेतील काही राज्यांमध्ये आता माघारी घेतली असली तरी महाराष्ट्रात मात्र महिनाअखेरीपर्यंत पावसाचा जोर कायम राहणार असल्याचे भाकित वर्तवले जात असल्यामुळे मराठवाड्यासह अनेक भागांतील लोकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. वास्तविक सध्याची पूरस्थिती पाहता राज्यभरातून पूरग्रस्त भागांमध्ये मदतीचा पाऊस पडण्याची सध्या गरज आहे.**

# एसटी चालक-वाहकांच्या डोक्यावर टांगती तलवार





खबरबात
महेश शिंदे

महाड एस टी. आगाराच्या जुन्या इमारतीच्या खिडकीवरील सज्जा शनिवारी रात्री नऊ वाजता कोसळला. ज्या इमारतीमध्ये चालक वाहक विश्रांती घेतात त्या इमारतीच्या छताचे स्लॅब कोसळू लागले आहे. एसटीचे चालक वाहक विश्रांतीसाठी थांबत असल्याने या धोकादायक इमारतीच्या छताची टांगती तलवार कायम राहिली आहे.

मुंबई गोवा महामार्गावरील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या महाड एसटी आगाराची इमारत जुनी झाली आहे. इमारतीचा मुख्य ढाचा दगडी असला तरी शेजारील बांधकाम मात्र काँक्रीट मधील आहे. या काँक्रीट मधील इमारतीमध्ये लांब पल्ल्याच्या गाड्यांचे चालक वाहक विश्रांतीसाठी थांबतात. मात्र या जुन्या इमारतीवर गेले अनेक वर्ष केवळ लाखो रुपये खर्च करून लाली पावडर लावण्याचा प्रकार एसटी महामंडळाचे अभियंते करत आहे. ज्या ठिकाणी चालक वाहक विश्रांतीसाठी थांबतात ती जागा त्यांच्यासाठी नरक यातना सारखी आहे. गेली अनेक वर्षे याठिकाणी लाखो रुपये खर्च झाले आहेत. मात्र तरी देखील या नरक यातना तशाच कायम राहिल्या आहेत. या इमारतीचे छत मोडकळीस आले असून जागोजागी छताचे सिमेंट कोसळल्याच्या खुणा दिसत आहेत. दोन दिवसांपूर्वी चालक वाहक असतानाच सिमेंट काँक्रीट कोसळल्याचे एका कर्मचाऱ्यांनी सांगितले. शनिवारी रात्री नऊ वाजता बाहेरील बाजूस असलेल्या खिडकीच्या वरील सिमेंटचा सज्जा कोसळला. यामध्ये एसटी कर्मचाऱ्यांच्या दुचाकीचे नुकसान झाले आहे. ही भरपाई देखील एसटी महामंडळाकडून मिळावी अशा प्रकारची मागणी संघटनांकडून केली जात आहे. ज्या ठिकाणी हे कर्मचारी विश्रांती घेतात त्या ठिकाणी शौचालयांची स्वच्छतागृहाची अतिशय दयनीय अवस्था आहे. हा भाग देखील कधीही कोसळू शकतो याबाबत वारंवार तक्रारी करून देखील एस टी महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाकडून दखल घेतली जात नसल्याचे सांगण्यात येत आहे.

जिन्यामध्ये विजेची व्यवस्था नाही तर जागोजागी थातूरमातूर कामे केल्याने सिमेंट काँक्रीट चा फुगलेला भाग कधीही या चालक वाहकांच्या अंगावर घडू शकतो. पावसाळ्यात ज्या ठिकाणी चालक वाहक विश्रांती घेतात तो सगळा भाग पाण्याने ओला झालेला असतो अशा परिस्थितीत देखील याच ठिकाणी झोपण्याशिवाय पर्याय नसतो असे येथील कर्मचाऱ्यांनी सांगितले. या इमारतीवर लाखो रुपये खर्च करुन केलेली कामे ही तकलादु असल्याचा आरोप होत आहे.

महाड एसटी आगाराचे आगार व्यवस्थापक या ठिकाणी उत्तम काम करत असले तरी जिल्हा प्रशासनाने योग्य ती दखल घेऊन मदत केली पाहिजे असे येथील कर्मचाऱ्यांनी सांगितले. आगारात निधी येत आहे मात्र त्याचा नियोजनबद्ध वापर होत नसल्याने नवीन इमारत अर्धवट राहिली आहे. नवीन इमारतीवर होणारा खर्च या जुन्या इमारतीवर खर्च करून ही ऐतिहासिक इमारत तशिच जतन केली असती तर आज ही वेळ आली नसती. काही दिवसांपूर्वी सुमारे ६० लाख रुपये खर्च करून आगाराच्या परिसरात काँक्रीटचे काम करण्यात आले. तोच पैसा इमारतीवर खर्च करून भराव करून डांबरीकरण केले असते तर पैशाची देखील बचत झाली असती आणि संपूर्ण परिसर व्यवस्थित झाला असता. मात्र काही भागच काँक्रिटीकरण करून केवळ पैसा लाटण्याचा प्रकार झाल्याने आगारामध्ये पावसाळ्यामध्ये तलाव साचत आहेत. एसटी महामंडळाने किमान चालक वाहकांचा विचार करून ते ज्या ठिकाणी विश्रांती घेतात ती इमारत दुरुस्त केली पाहिजे. एसटीच्या कामगारांच्या जिवीताची जबाबदारी ही एसटी ची आहे पर्यायाने ही जबाबदारी शासनाची आहे. मात्र प्रवासी आणि कामगारां बाबत शासन आणि महामंडळ उदासीन असल्याचे दिसून येते.

# कडापेची श्री कालिकाई माता

माणगाव तालुक्यातील कडापे गावामध्ये असलेल्या श्रीकालिकाई व श्री बापूजीबुवा मंदिर म्हणजे शाक्तपंथीय कायस्थांचे शक्तिपीठ म्हणून ओळखले जाते. वेगवेगळ्या गोत्रांमधील कायस्थ कुटुंबे श्रीकालिकाई मातेला कुलदेवता मानतात. सध्याच्या कांदळगाव- जिता हमरस्त्यालगतच एका छोट्याशा टेकडीवर हे मंदिर वसलेले आहे.

या मंदिराबद्दलच्या आख्यायिकेनुसार श्रीकालिकाई रौद्र स्वरूपात उत्तरेकडून दक्षिणेकडे चालली असताना , श्री बापुजीबुवा ह्या पुण्यपुरूषाने श्रीकालिकाईला शांत केली व तिचे रौद्र रुप रोखले. त्यामुळे दक्षिणोत्तर असे दोघांचे मुख पाहायला मिळते.



प्रचलित माहितीनुसार, शाक्तपंथामध्ये सात बहिणींचा उल्लेख केला जातो .त्यात तळा येथील श्री.चंडिकामाता , कडापेची कालिकाई (कडापकरीण ) , वानस्ते गावची कालिकाई ( वानस्तेकरीण) , घोसाळकर देशमुखांची कुलदेवता खाजणी गावची (श्री खाजणाई), डोंगर आळीची कालिकाई, श्री वावेकरीण, श्री पिष्ठई माता अशा सात बहिणींचा उल्लेख आढळतो...

श्रीकालिकाई मातेचं मूळ स्वरूप फक्त तांदळ्याचे आहे. त्यावर देवीचा मुखवटा व रूप देऊन साडीचोळी घातली जाते. परिसरातील असंख्य सुवासिनी नेहमी देवीची ओटी भरतात. चैत्र पौर्णिमेस येथे उत्सव यात्रा भरते. कडापे गावातून तसेच शेजारील पंचक्रोशीतून उंच बांबूच्या सुशोभित काठ्या ( सासनकाठ्या) वाद्यांच्या गजरात नाचवत असतात. ह्या काठ्या नाचवत प्रदक्षिणा घालून नंतर देवीसमोर ठेवल्या जातात.

नवरात्रामध्येही श्रीकालिकाई मातेच्या दर्शनासाठी माणगाव तालुक्यातील असंख्य देवीभक्त येत असतात.गुप्ते,कुळकर्णी, सुळे ,कर्णिक आणि महाडकर टिपणीस कुटुंब कडापकरीण श्रीकालिकाईला कुलदैवत मानतात.श्रीकालिकाई व श्री बापूजीबुवा मंदिराच्या दैनंदिन पूजाअर्चा तसेच व्यवस्थापनाकरिता ट्रस्ट बनवला असून यामध्ये स्थानिक कडापे ग्रामस्थ व चांद्रसेनीय कायस्थ प्रभू मंडळींचा समावेश आहे.

**-संतोष सुतार**




# मारुतीची नवीन कॉम्पॅक्ट एसयूव्ही व्हिक्टोरिस लाँच

ग्रँड विटारा नंतर ही मारुतीची दुसरी मध्यम आकाराची एसयूव्ही आहे. ती कंपनीच्या एरिना डीलरशिप नेटवर्कवर विकली जाईल. कंपनीने तिची सुरुवातीची एक्स-शोरूम किंमत १०.५० लाख रुपये ठेवली आहे. ही सहा प्रकारांमध्ये उपलब्ध आहे आकर्षक बाह्य डिझाइन आणि आधुनिक इंटीरियरसह, व्हिक्टोरिसमध्ये मोठ्या टचस्क्रीन, डिजिटल ड्रायव्हर डिस्प्ले, हायब्रिड आणि सीएनजी पर्यायांसह अनेक नवीन वैशिष्ट्ये देखील आहेत.



डिझाइन: आधुनिक आणि ठळक लूक

व्हिक्टोरिसमध्ये समोर जाड एलईडी हेडलाइट्स आहेत, जे पातळ ग्रिल कव्हरशी जोडलेले आहेत आणि वर क्रोम स्ट्रिप आहे. संपूर्ण शरीराभोवती जाड प्लास्टिक क्लॅडिंग देण्यात आले आहे, जे तिला रफ आणि टफ लूक देते, तसेच सिल्व्हर स्किड प्लेट देखील देते.

साइड प्रोफाइलमध्ये १८-इंच अलॉय व्हील्स, सिल्व्हर रूफ रेल आणि स्क्वेअर-ऑफ बॉडी क्लॅडिंग आहे, जे त्याला एक स्पोर्टी लूक देते. मागील बाजूस सेगमेंटेड एलईडी लाईट बार आणि 'व्हिक्टोरिस' बॅजिंग आहे. एकंदरीत, डिझाइन आधुनिक आणि प्रीमियम दिसते, जे शहरातील रस्त्यांपासून ते महामार्गांपर्यंत सर्व गोष्टींना अनुकूल असेल. इंटीरियर डॅशबोर्ड तंत्रज्ञानावर केंद्रित आहे, ज्यामध्ये १०.२५-इंच इन्फोटेनमेंट टचस्क्रीन, डिजिटल ड्रायव्हर डिस्प्ले आणि तीन-स्पोक स्टीअरिंग व्हील आहे. यात एका कुटुंबासाठी पुरेशी जागा असलेले ५-सीटर केबिन आहे. लेदरेट सीट अपहोल्स्ट्री, ॲम्बियंट लाइटिंग आणि ऑटोमॅटिक क्लायमेट कंट्रोल सारख्या वैशिष्ट्यांमुळे ते आरामदायी बनते.

इंजिन : तीन पर्याय उपलब्धप्रत्येक ग्राहकाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी व्हिक्टोरिसमध्ये तीन पॉवरट्रेन पर्याय उपलब्ध आहेतवैशिष्ट्ये आणि सुरक्षितता : पॅनोरामिक सनरूफ आणि लेव्हल २ एडीएएसव्हिक्टोरिस ही वैशिष्ट्यांच्या बाबतीत अव्वल दर्जाची आहे. इन्फोटेनमेंटमध्ये १०.२५-इंचाची टचस्क्रीन आहे, जी वायरलेस ॲपल कारप्ले आणि अँड्रॉइड ऑटोला सपोर्ट करते. ८-स्पीकर साउंड सिस्टममध्ये डॉल्बी ॲटमॉस तसेच कनेक्टेड कार तंत्रज्ञान आहे.सुरक्षेबद्दल बोलायचे झाले तर, ही मारुतीची पहिली कार आहे ज्यामध्ये लेव्हल २ एडीएएस (ॲडव्हान्स्ड ड्रायव्हर असिस्टन्स सिस्टम) आहे.

# लेखक, शब्दकोशकार, अनुवादक श्रीपाद जोशी



निमित्त

श्रीपाद जोशी यांचे रूढ शिक्षण मॅट्रिकपर्यंतच झाले, आज त्यांचा स्मृतिदिन (२४ सप्टेंबर २००२) आहे. श्रीपाद जोशी हे ग्रहणशील मन आणि सुशिक्षित, सुसंस्कृत माणसांचा सहवास यांमुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व विचारी आणि विवेकी बनले. आचार्य काका कालेलकरांकडे आठ वर्षे राहून ते हिंदी, गुजराती, बंगाली या भाषा शिकले. दिल्लीत एक वर्ष राहून त्यांनी उर्दू साहित्याचा अभ्यास रसिकतेने केला.

१९४२ सालच्या 'छोडो भारत' चळवळीत सरकारविरोधी पत्रके वाटल्याबद्दल त्यांना कारावासाची शिक्षा झाली. कारावासातच त्यांनी कथा, कादंबरी, अनुवाद अशा स्वरूपाचे लेखन केले. पुढे गांधीजींच्या 'हिंदुस्थानी प्रचार सभा' संस्थेत दोन वर्षे चिटणीस आणि नंतर गारगोटी येथील मौनी विद्यापीठात चार वर्षे, तसेच पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेत पंधरा वर्षे त्यांनी काम केले.

जोशी यांनी लहान-मोठी सुमारे दीडशे पुस्तके लिहिली. त्यांपैकी काही महत्त्वाच्या पुस्तकांचा परिचय इथे दिला आहे. रामानंद सागर लिखित 'और इन्सान मर गया' या हिंदी कादंबरीचे मराठी भाषांतर 'आणि माणसाचा मुडदा पडला' हे आहे. भारताच्या फाळणीच्या वेळी हिंदू-मुसलमानांमधील द्वेष किती पराकोटीला गेला होता, आणि त्यामुळे केवढा भीषण रक्तपात झाला, याचे थरारक दर्शन ही कादंबरी घडविते.

'विस्कटलेलं घरटं' ही जोशींची स्वतंत्र कादंबरी होय. महाराष्ट्रातील ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद, स्पृश्यास्पृश्य वाद, खेडे-शहर, कूळ-जमीनमालक अशा वर्तमानकालीन द्वंद्वांवर ही कादंबरी प्रकाश टाकते. जेव्हा या द्वंद्वांशी संबंधित लोक, राजकीय पुढारी या वादांवर निर्मळ मनाने विचार करतील, तेव्हाच या वादांना मूठमाती मिळेल; असे लेखकाचे म्हणणे आहे.


'भारतीय मुसलमान: काल, आज, उद्या' हे लेखकाचे एक महत्त्वाचे पुस्तक. मुसलमानांच्या परिस्थितीची वस्तुनिष्ठ चर्चा करून लेखक असा निष्कर्ष काढतात की, जुना इतिहास विसरून मुसलमान या भारतभूमीशी एकरूप झाले, तर इतर जातींप्रमाणे त्यांचेही भवितव्य उज्ज्वल होईल. मात्र ज्यांना भारतीय राज्यघटनेची चौकट मान्य नाही, त्यांना या देशात स्थान नाही. असे आपले परखड मत लेखकाने नोंदविलेले आहे.

'खलील जिब्रान' हा लेबॅनॉनमधील स्वतंत्र विचारांचा लेखक, कवी आणि चित्रकार होय. तो ख्रिश्चन होता. पण त्याची जीवनमूल्ये फारच उच्च आणि प्रचलित ख्रिस्ती विचारांना धक्का देणारी होती. मराठी वाचकांना खलील जिब्रान कळावा म्हणून त्यांची सात पुस्तके लेखकाने मराठीत अनुवादित केलेली आहेत.

'जा जरा पूर्वेकडे' ह्या पुस्तकात जपानमधील प्रवासाचे वर्णन आहे. एकंदरीत जोशींच्या पुस्तकांमधून त्यांचे गांधीवादी, समाजवादी विचार आणि त्यांचे समतोल, उदार मनही कळते.'उर्दू-मराठी शब्दकोश' लिहून जोशी यांनी मराठी, उर्दू अभ्यासकांची फार मोठी सोय करून ठेवली आहे.त्यांना साहित्य अकादमीच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

**-शशिकांत मांडके**

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर

# ओठांसाठी काय आहे अधिक फायदेशीर?

आपले ओठ अत्यंत नाजूक असतात आणि त्यामुळंच हवामान, गरम-थंड बदल, एसीमधील सतत वास्तव्य किंवा शरीरातील पाण्याच्या कमतरतेचा परिणाम सर्वप्रथम होठांवरच दिसून येतो. फाटलेले, कोरडे आणि खवखवीत ओठ ही आता फक्त हिवाळ्यातलीच समस्या उरलेली नाही, तर वर्षभर भेडसावणारी बाब झाली आहे. अशा स्थितीत होठांच्या देखभालीसाठी आपण बहुतेक वेळा दोन गोष्टींमध्ये अडकतो.



**लिप बाम की लिप ऑईल?**

आज आपण जाणून घेणार आहोत की या दोघांमध्ये नेमकं काय वेगळं आहे, त्यांचे फायदे काय आहेत आणि तुमच्या ओठांसाठी कोणता पर्याय अधिक योग्य ठरेल.

**लिप बाम-पारंपरिक आणि सुरक्षित पर्याय**

लिप बाम हे अनेक वर्षांपासून वापरलं जाणारं एक पारंपरिक उपाय आहे. यामध्ये बीजवॅक्स, शिया बटर, पेट्रोलियम जेली किंवा गायचं साजूक तूप अशा घटकांचा समावेश असतो. यामुळे लिप बाम हा एक जाडसर थर तयार करतो, जो कोरडेपणा, थंडी आणि वाऱ्यापासून ओठांना संरक्षण देतो. विशेषतः फाटलेले, जळजळीत किंवा त्रासदायक होठ असतील, तर लिप बाम त्यावर दाट संरक्षणात्मक थर देऊन नमी टिकवून ठेवतो. रात्री झोपण्याआधी लावल्यास हा परिणाम अधिक चांगला दिसतो.

**लिप ऑईल-सौंदर्यसाठी हायड्रेटिंग टच**

दुसरीकडे, लिप ऑईल हे एक आधुनिक, हलकं आणि सौंदर्यदृष्टीने आकर्षक पर्याय आहे. हे लिक्विड स्वरूपात असतं आणि यामध्ये नारळ तेल, जोजोबा ऑईल, बदाम तेल आणि व्हिटॅमिन ई यासारख्या घटकांचा समावेश असतो. लिप ऑईल हे फक्त बाहेरून थर देत नाही, तर आतूनही ओठांना नमी देतं आणि त्यांना मृदू आणि चमकदार बनवतं. विशेषतः दिवसा किंवा मेकअपच्या आधी वापरण्यासाठी हे खूप उपयुक्त ठरतं, कारण ते चिटचिटीत न वाटता एक नैसर्गिक ग्लॉसी फिनिश देतं.

खरंतर लिप बाम आणि लिप ऑईल दोघेही ओठांची देखभाल करण्यात प्रभावी आहेत. परंतु त्यांचा वापर आपल्याला आपल्या होठांच्या स्थितीच्या आधारे ठरवावा लागतो. दोन्हीचा संतुलित वापर करणेच हे तुमच्या सौंदर्याचे आणि आरोग्याचे रहस्य ठरू शकते.

# विदेशी पक्ष्यांची चोरी करणारे दोन आरोपी चेन्नईत जेरबंद

## १२ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**कर्जत, नेरळ: प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील रिवॉवाइल्ड सेंच्युरी ॲण्ड चॅरिटेबल ट्रस्ट, टेंबरे आंबिवली येथून चोरले गेलेले मौल्यवान विदेशी पक्षी व इतर साहित्य कर्जत पोलिसांनी तामिळनाडूतून हस्तगत केले. चेन्नई येथे दोन चोरट्यांना अटक करण्यात आली असून, १२ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

१६ जुलै रोजी पहाटेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी फार्महाऊसचे लोखंडी जाळे फोडून मौल्यवान विदेशी पक्षी व उपकरणे चोरी करून नेली होती. यात ९ आफ्रिकन ग्रे पॅरट,२ ब्ल्यू गोल्ड मकाव,१ स्कार्लेट मकाव अशा १२ विदेशी पक्ष्यांसह काही महागडी उपकरणेही चोरून नेली होती. एकूण मुद्देमालाची किंमत १२ लाख इतकी कर्जत पोलिस तक्रारीत नोंद करण्यात आली होती.या घटनेत पोलिसांना अनेक अडचणीचा सामना करावा लागला.सीसीटिव्ही बंद असल्याने माहिती मिळत नव्हती अखेर तांत्रिक आधार घेत तपासानंतर पोलिसांना माहिती मिळाली की आरोपी हे पक्षी घेऊन दक्षिण भारतात पळून गेले आहेत. त्यानुसार पथकाने गुप्त माहितीच्या आधारे चेन्नई (तामिळनाडू) येथे शोध घेत दोन्ही आरोपींना पकडले.अनिल रामकृष्ण जाधव (वय २९, रा. वडवळ, ता. खालापूर, जि. रायगड) येथे राहत होता तर त्याचा साथीदार राजेशसिंग माही उर्फ संमशेरशिंग (रा. महिम पश्चिम, साईनाथ चौक, दिल्ली) येथील आहे.या दोघांकडून चोरीस गेलेले विदेशी पक्षी व साहित्य पोलिसांनी हस्तगत केले आहे.

ही कारवाई रायगड पोलिस अधिक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच कर्जत उपविभागीय पोलिस अधिकारी राहुल गायकवाड यांच्या नेतृत्वात कर्जत पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप भोसले यांनी तयार केलेले तपासिक पथक अधिकारी राहुल वरोटे,किरण नवले,सुशांत वरक,समीर भोईर यांच्यासह मोठी टीम तयार करून चोरट्यांना यशस्वी पकडण्यात या अधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.



# रायगड जिल्ह्यासह कोकणाचा विकास फक्त भाजपच करून शकतो –सुबोध जाधव




**माणगाव : बातमीदार**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला कोकण तसेच रायगड जिल्हात मोठा धक्का बसला असून तळ कोकण आणि रायगड जिल्हातून महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा राज ठाकरे यांचा पक्ष आता कायमचा हद्पार झाला झाल्याचे दिसत आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण पक्षाची स्थापना झाल्या पासून तळ कोकणातून खेड नगरापालीकेचे नगराध्यक्ष तथा महाराष्ट्र नवनिर्माण पक्षाचे महाराष्ट्र सरचिटणीस वैभव खेडेकर तसेच महाराष्ट्र नवनिर्माण पक्षाचे रायगड दक्षिण जिल्हा अध्यक्ष सुबोध जाधव हे कोकणातील दोन नेते पक्षाचे तन,मन,धन लावून काम करत असताना पक्ष वाढवत असताना काही दिवसापूर्वी अचानक पणे मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी पक्षातून बडतर्फ केले. त्यामुळे मनसे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये मोठी नाराजी पसरली असताना वैभव खेडेकर अणि सुबोध जाधव यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोंदी तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेद्र फडणवीस यांच्या विकासकामाकडे पाहुण देशातील शक्तीशाली अशा भाजप पक्षात प्रवेश करण्यासाठी त्यांनी मंगळवार दि.२३ सप्टेंबर रोजी मुंबई मंत्रालय येथे मुख्यमंत्री देवेद्र फडणवीस यांच्या उपस्थित पक्ष प्रवेश होणार असून कोकण तसेच रायगडमधून हजारोच्या संखेने मनसे पदाधिकारी कार्यकर्ते महिलावर्ग हे इंदापूरमधून सकाळी वाहनाचा ताफा घेऊन सकाळी मुंबईच्या दिशेने गेले. त्यामुळे तळकोकण तसेच रायगडामधून मनसेही हद्दपार होणार झाली आहे.

इंदापूर येथे सुबोध जाधव यांच्या कार्यालयात वैभव खेडेकर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, मी मनसे पक्षाच्या स्थापने पासून काम करत असून मनसेचे रोपटे मी कोकणात रोवले असून आता फळे येण्याची वेळ आली असता मला पक्षातून बडतर्फ केले. मी तर ३५ वर्षे राज ठाकरे यांच्या बरोबर काम केले असून आता भाजप पक्षात जात असून कोकणात भाजप शत प्रतिशत करणार असल्याचे त्यांनी शेवटी बोलताना सांगितले. महाराष्ट्राचा विकास आसो किवा कोकणाचा विकास भाजप पक्षा शिवाय पर्याय नाही रायगड व श्रीवर्धनचा विकास हा फक्त भाजप पक्ष करू शकतो, असे सुबोध जाधव यांनी सांगितले.

## सावधान नोटीस

तमाम जनतेस या सावधान नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल **श्रीमती सुलभा श्रीकांत देशमुख** यांनी खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत **पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात स्पे. मु.नं. ७१/२०२४** हा दावा **श्री. रविंद्र दत्तात्रेय मांडे, श्री. रमेश दत्तात्रेय मांडे, श्री. अशोक दत्तात्रेय मांडे, श्रीमती जयश्री भालचंद्र भालेराव, कु, माई दत्तात्रेय मांडे** यांच्या विरुध्द दाखल केलेला आहे. सदरचा दावा अद्याप न्यायप्रविष्ठ आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे–तळेगाव, ता. खालापूर, जि. रायगड**

| भूमापन नं./ | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ४७ | २ | ०–४९–०० | ११.५० |
| ४७ | ४ | ०–५७–०० | १३.६९ |

तरी या सावधान नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, वरील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीबाबत कोणीही **श्री. रविंद्र दत्तात्रेय मांडे, वगैरे** अथवा इतर कोणाशीही कोणताही व्यवहार करु नये व असा व्यवहार करण्यात आल्यास तो बेकायदेशिर ठरेल व तो आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी

**पनवेल.**
**दि. २३/०९/२०२५**

**सही/–**
**ॲड. श्री. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
दूरध्वनी क्र. : २७४५६३०६

# मुरूडमध्ये रस्त्यावर गुरे सोडल्यास पालिका करणार मालकांवर कारवाई



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड शहर व परिसरात रस्त्यावर गाई, बैल, वासरे, घोडे या सारखी पाळीव जनावरे मोकाट फिरत असून नागरिकांना यांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. यामुळे नगरपरिषदेला नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येत आहेत. गुरांना पकडून कोंडवाड्यात टाकण्यात यावेत व गुरे मालकांकडून मोठा दंड वसूल करण्यात यावा अशी शहरातील नागरिकांची प्रमुख मागणी होती.

मुरुड शहरातील नागरिकांच्या मागणीला नगरपरिषदेने प्रतिसाद दिला असून वर्तमान पत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करून नगरपरिषद प्रशासनाने गुरे–मालकांना थेट इशारा दिला आहे की, मोकाट गुरं ताबडतोब आवरा अन्यथा गुरांची जप्ती करून लिलाव किंवा शासकीय गोशाळेत सुपूर्द करण्यात येतील असा इशारा देण्यात आला आहे.भटक्या गुरांमुळे नागरिकांना त्रास अथवा जखमी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी गुरांच्या मालकावर राहणार आहे.महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ च्या कलमान्वये अशा मालकांवर दंडात्मक कारवाईसह पहिली कायदेशीर पावलं उचलली जाणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे.मुरुड शहराच्या नागरिकांच्या मागणीवर सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

मुरुड नगरपरिषदेच्या ताब्यात काही कोंडवाडे आहेत.दस्तुरी नाका व अन्य ठिकाणी असणारे कोंडवाडे सर्वप्रथम त्याची साफसफाई करून पकडलेली गुरे त्यामध्ये टाकणे खूप आवश्यक आहे.गुरे पकडल्यानंतर ती ठेवणार कोठे हा मोठा प्रश्न नगरपरिषदेसमोर आहे.यासाठी कोंडवाडे सुसज्ज करून हि मोहीम तातडीने सुरु करण्यात यावी अशी मागणी होत आहे.


## पनवेल महानगरपालिका
### ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

### प्रसिद्धीप्रत्रक

पनवेल महानगरपालिका नागरिकांना पारदर्शक वेगवान आणि सुलभ सेवा पुरविण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. आधूनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन नागरिकांना सेवा पुरविण्यासाठी पनवेल महानगरपालिका कार्यरत आहे. याचाच भाग म्हणून पनवेल महानगरपालिकेमार्फत पनवेल महानगरपालिकेची अधिकृत वेबसाईट www.panvelmunicipalcorporation.com या वेबसाईट वरती पनवेल महानगरपालिके मार्फत देण्यात येणाऱ्या ७० लोकसेवांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

तरी सर्व नागरिकांनी याची नोंद घ्यावी.

**जा.क्र :–पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ४७६/४८९/२०२५**
**दिनांक :– २३/०९/२०२५**

**सही–**
**(कैलास गावडे)**
**उप आयुक्त (मुख्यालय)**
**सामान्य प्रशासन विभाग**



## पनवेल महानगरपालिका
### शहर अभियंता विभाग
### ई-निविदा सूचना

जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.४७६/४८९/२०२५ दिनांक :– २३/०९/२०२५

**आयुक्त पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय** (Central Government / State Government / Government under taking) **विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी–१ शतमान पध्दतीनुसार जाहीर ई–निविदा मागवित आहेत.**

| अ.क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/60/ 2025-26 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील महानगरपालिका मालकीच्या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले शाळा क्र. ०८, पोदी शाळेची दुरुस्ती करणे. | ३१,६६,१९५/– |

या कामाच्या ई–निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर **दि. २४/०९/२०२४** रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदा धारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**अतिरिक्त आयुक्त– I**
**पनवेल महानगरपालिका**


# नवरात्रोत्सवात कमळाच्या फुलांची मागणी वाढली

## आदिवासींचा रोजगारांचा प्रश्न मार्गी

**खोपोली : प्रतिनिधी**

दुर्गामातेला कमळपुष्प वाहण्याची प्रथा असल्याने सुरू पासून उद्या पासून नवरात्रोत्सवात देवीच्या पुजेकरीता कमळ भक्तांकडून खरेदी करताना बाजार पेठेत पहावयास मिळत असून यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली असून विक्रीतून आदिवासींना रोजगारांचा प्रश्न मार्गी लागत असून तर भक्तांनी फुल देवीला अर्पण केल्यामुळे समाधान मिळते आहे.

कमळाचे फुल हे भारताचे राष्ट्रीय फूल असून धार्मिक, सांस्कृतिक मध्ये तसेच कमळ बहुगुणी असल्याचे आयुर्वेदानेही स्पष्ट केले आहे. दुर्गामातेला कमळ फुल वाहण्याची प्रथा असल्याने



नवरात्रोत्सवात भक्तांकडून ते वाहण्याला प्राधान्य दिले जाते.तालुक्यातील विविध गावांमधील तलावात उमललेल्या कमळाचे दृश्य पाहून मन मोहून जाते.

त्याच प्रमाणे कमळाच्या लाल व उपल्या दोन जाती आढळतात. पाने गुळगुळीत, खाली लवदार असून देठ लाल नारंगी रंगाचा असतो. ही कमळ सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात उमलतात. उपल्या कमळाची पान वर्तुळाकार असून पानाच्या खालच्या बाजूस ठिपके असतात. जांभळी, फिकट, निळी, पांढरी, गुलाबी इ. विविधरंगी फुलांना मंद सुवास असतो. तलावातून कमळांची फुल गोळा करून रेल्वे स्थानक, मुख्य रस्ता, सार्वजनिक स्थळी मोठ्या प्रमाणात विक्री होत असल्याचे दिसत आहे.


## महाराष्ट्र शासन
### कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल
**पिनकोड–४१०२०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
दूरध्वनी क्रमांक ०२२–२७४५२७७८ फॅक्स–०२२–२७४६७४४०

### ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. २४ (ई-निविदा) सन २०२५-२६

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२–२७४५२७७८ फॅक्स–०२२–२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी–१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई–निविदा सूचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे. **टिप–** या निविदेमध्ये एकूण ०२ काम समाविष्ट असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक २५.०९.२०२५ सकाळी १०.०० ते दिनांक ०२.१०.२०२५ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

**ई–निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड**
**दिनांक : २३/०९/२०२५**
**विमाका/कोवि/२०२५–२०२६/११४**

**सही/–**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पनवेल**


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे बेलवली, ता. पनवेल, जि. रायगड येथील **वैभव विष्णु भगत व इतर ४** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी मालकी हक्काचे पडताळणी करून खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे बेलवली, तालुका. पनवेल, जि. रायगड.**

| कब्जेदारांचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| वैभव विष्णु भगत व इतर ४ | ५८ | २ | ०–३१–८०<br>पो.ख ०–०२–३०<br>०–३४–१०<br>पैकी खरेदी<br>क्षेत्र ०–२२–००<br>हे.आर.चौ.मी | ६.६२ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **१४ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक : २३/०९/२०२५**

**सही/–**
**ॲड. श्री. अमोल शंकर साखरे**
**७, पर्ल कॅसल को. ऑप. हौसिंग सोसायटी, साई नगर रोड,**
**पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मो.८६५२२३३७७१**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे लोणिवली, ता. पनवेल, जि. रायगड येथील **प्रविण काशिनाथ हावरे** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी मालकी हक्काचे पडताळणी करून खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे लोणिवली, तालुका. पनवेल, जि. रायगड.**

| कब्जेदारांचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| प्रविण काशिनाथ हावरे | १६९ | १/४/५ | ०–९३–२०<br>पो.ख ०–२३–३०<br>१–१६–५० | ९.४३ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक : २३/०९/२०२५**

**सही/–**
**ॲड. श्री. अमोल शंकर साखरे**
**७, पर्ल कॅसल को. ऑप. हौसिंग सोसायटी, साई नगर रोड,**
**पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मो.८६५२२३३७७१**

# भाजपतर्फे समाजोपयोगी उपक्रम

## वाशीत आरोग्य शिबिर

### ज्येष्ठांना औषधे आणि उपचारांबाबत मार्गदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी सेक्टर ९ येथील भाजप जनसंपर्क कार्यालयात सेवा पंधरवडा अभियानानिमित्त मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन एमजीएम रुग्णालय वाशी यांच्या सहकार्याने करण्यात आले होते. सदर मोफत महाआरोग्य शिबिराला शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत शिबिराचा लाभला. या वेळी बेलापुर विधानसभा संयोजक निलेश म्हात्रे, भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, वाशी मंडळ अध्यक्ष विकास सोरटे उपस्थित होते.

महाआरोग्य शिबिरामध्ये बॉडी मास इंडेक्स, रँडम ब्लड शुगर, ब्लड प्रेशर, फ्री डॉक्टर कन्सल्टेशन, ईसीजी, दंत तपासणी, डोळ्यांची तपासणी, आयुर्वेदिक डॉक्टरांचा सल्ला तसेच मोफत औषधे, डाबर च्यवनप्राश व मोफत चष्म्याचे वाटप करण्यात आले. पुढील उपचारांसाठी नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच कोणता आहार योग्य व किती प्रमाणात घ्यावा हे ही सांगण्यात आले.



आगामी काळात सर्दी, ताप, डेंग्यू, मलेरिया अशा अनेक प्रकारच्या आजारांपासून नागरिकांचे संरक्षण व्हावे म्हणून मोफत महाआरोग्य शिबिराची संकल्पना आपण प्रत्येक विभागात नागरिकांसाठी उपलब्ध करण्यात येणार असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

या वेळी राजू शिंदे, भरत मावळे, माजी वाशी मंडळ अध्यक्ष मंगेश चव्हाण, प्रताप भोसकर, रामकृष्ण अय्यर, महेश दरेकर, प्रवीण भगत, सुमा रंजीत, जयंत पाटील, क्षितिजा घोरपडे, मालती सोनी, प्रमिला खडसे वाशी विभागातील सोसायटींचे पदाधिकारी व असंख्य नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते.



## रुग्णांना फळेवाटप

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालया अंतर्गत असलेल्या आभा कार्डच्या नोंदणी व त्वरित डिजिटल कार्ड वाटप कॅम्पचे आयोजन वाशी येथील फँटासिया मॉल येथे करण्यात आले होते तसेच जुईनगर येथील भाजप जनसंपर्क कार्यालयात डिजिटल मतदान कार्ड सहाय्यता शिबिर, वाशीगावात मनपा कोंडवाड्यातील गुरांना हिरवा चारा पुरवठा मनपा रुग्णालयातील रुग्णांना फळेवाटप आणि कर्मचारी यांना भेटवस्तू विद्यार्थी हर्षित भगत यांनी केल्या तर घरेलू महिलांचा सन्मान व सेफ्टी किटचे वाटप आदी उपक्रम माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. वनमंत्री गणेश नाईक यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने घेण्यात आले.

## इनरव्हील क्लब ऑफ पनवेलतर्फे विविध कार्यक्रम

**पनवेल : बातमीदार**

इनरव्हील क्लब ऑफ पनवेलतर्फे आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके माध्यमिक विद्यालय येथे विद्यालयातील गुणवंत शिक्षकांना प्रशस्तीपत्र, भेटवस्तू व मिठाई देऊन सन्मानित करण्यात आले. क्लब सीपीसी सुलभा निंबाळकर यांनी इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थिनींसाठी 'गुड टच बॅड टच' या विषयावर मार्गदर्शन केले तसेच या विद्यालयातील चित्रकला विषयाच्या स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी.

आ. बांठीया विद्यालयाचे पर्यवेक्षक आणि तज्ञ चित्रकला मार्गदर्शक बी. यु. महाजन यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक सी. के. तिरमले यांनी प्रास्ताविक करून क्लब प्रेसिडेंट शुभांगी





पिंपळकर ट्रेजरर अवंतिका मारुलकर आणि सी. पी. सी. सुलभा निंबाळकर यांना शाल व श्रीफळ देऊन स्वागत केले.याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक व त्यांचे सहकारी या सर्वांचे प्रेसिडेंट शुभांगी पिंपळकर यांनी आभार मानले.



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल मार्केट यार्ड येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसनिमित्त सेवा पंधरवाडा उपक्रमांतर्गत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सौजन्याने वह्या वाटप माजी नगरसेविका डॉ. सुरेखा विलास मोहोकर यांच्या हस्ते करण्यात आले तसेच चित्रकला व रांगोळी स्पर्धातील विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक देवेंद्र पाटील, उपमुख्याध्यापक, शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व शालेय विद्यार्थी उपस्थित होते.**

## दुर्गामाता दौड (माळ दुसरी)






**पनवेल : श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानमार्फत मंगळवारी दोन ठिकाणी श्री दुर्गामाता दौड काढण्यात आली. पहिल्या दौडीची सुरुवात नवीन पनवेल सेक्टर १८ सी-५ इथून झाली. पुढे नवीन पनवेल स्टेशन रस्ता, ॲड. मनोज भुजबळ आयोजित नवरात्रोत्सवात जाऊन देवीची आरती करण्यात आली. तिथून सेक्टर १३-१४मध्ये विनोद वाघमारे यांच्या नवरात्रोत्सवात श्लोक घेण्यात आले. तिथून पुन्हा सुरुवातीच्या ठिकाणी जाऊन शेवट करण्यात आला. दुसरी दौड ही पनवेलमधील डेरवली या गावात काढण्यात आली. दरम्यान, या दौडमध्ये सहभागी होण्यासाठी शुभम साळुंखे (९७०२७०६२६२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.**

## रोहिदास पोटे यांच्या 'गझलगंधाक्षरी'ला पुरस्कार जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



कोकण मराठी साहित्य परिषदेचे वाड्मयीन पुरस्कार २० सप्टेंबर २०२५ला जाहीर झाले. कथा, कविता, कादंबरी, नाटक व समीक्षा असे विविध वाङ्मय पुरस्कार जाहीर झाले आहेत. यात पनवेलचे साहित्यिक रोहिदास पोटे यांच्या 'गझलगंधाक्षरी' या समीक्षा ग्रंथाला 'प्रभाकर पाध्ये स्मृती समीक्षा पुरस्कार' जाहीर झाला आहे.

रोहिदास पोटे कवी, लेखक, गझलकार व समीक्षक आहेत. तसेच ते महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षण सहसंचालक आहेत. त्यांच्या नावावर कविता, गझल, लेख, समीक्षा या प्रकारातील १३ पुस्तके आहेत. यापूर्वी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. शालेय अभ्यासक्रमात व विद्यापीठीय अभ्यासक्रमात त्यांच्या कवितांचा समावेश झालेला आहे.

कोकण मराठी साहित्य परिषद पनवेल शाखेचे सल्लागार, पार्वती साहित्यकला निकेतनचे अध्यक्ष, के.गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय पनवेलचे कार्यकारिणी सदस्य, ज्ञानसाधना वाचनालय व ग्रंथालय नवीन पनवेलचे उपाध्यक्ष, रायगड जिल्हा मराठी अध्यापक संघाचे समन्वयक व मार्गदर्शक अशा विविध संस्थांवर ते कार्यरत आहेत. पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे ज्येष्ठ गझलकार अे.के. शेख, ज्येष्ठ साहित्यिका ॲड.सुनिता जोशी, कोमसाप पनवेलचे अध्यक्ष सुभाष कुडके व उपाध्यक्ष नागनाथ डोलारे या विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## पनवेल महापालिकेकडून सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या हद्दीत 'स्वच्छोत्सव स्वच्छता ही सेवा २०२५' अभियान आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविले जात आहे. या अभियानांतर्गत प्रभाग समिती 'अ'खारघर व प्रभाग समिती 'ब' कळंबोली प्रभाग समिती क्षेत्रात विशेष स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. या मोहिमेत दुर्लक्षित कचरा साठणाऱ्या ठिकाणी (CTU) व सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता करण्यात आली.



प्रभाग समिती 'अ' अंतर्गत दुर्लक्षित कचरा साठणाऱ्या ठिकाणी (सीटीयू) ठिकाणी नागरिकांच्या सहभागातून मोठी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

प्रभाग समिती 'ब' अंतर्गतही 'स्वच्छोत्सव २०२५' या उपक्रमांतर्गत रस्ते, चौक, सार्वजनिक ठिकाणे व सुविधा केंद्रे याठिकाणी व्यापक स्वच्छता करण्यात आली. स्थानिक नागरिक, सामाजिक संस्था, प्रभाग समितीचे अधिकारी व कर्मचारी यांच्या सहभागामुळे मोठ्या प्रमाणावर उपक्रम यशस्वी झाला.

## नवरंग — रंग लाल



रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघर




रामशेठ ठाकूर महाविद्यालय, खारघर



तु.ह. वाजेकर विद्यालय फुंडे, उरण



सीकेटी विद्यालय (इंग्लिश माध्यम प्राथमिक विभाग), नवीन पनवेल



नवी मुंबई महापालिका शाळा क्रमांक ३५, कोपरखैरणे



भक्तीसागर सोसायटी महिलावर्ग, धाटाव, रोहा



खोपोली महिला मंडळ



प्रगती महिला मंडळ सेक्टर २, नेरूळ, नवी मुंबई

# विहुले ग्रामस्थ, ग्रामपंचायत सदस्य भाजपमध्ये

**माणगाव : प्रतिनिधी**




माणगाव तालुक्यातील साई पंचायत समिती गणामधील विहुले गावातील ग्रामस्थांनी भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर पक्षप्रवेश केला आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशीलदादा पाटील यांच्या विकासात्मक दृष्टिकोनाकडे प्रभावीत होऊन भारतीय जनता पक्षात पक्षप्रवेश करत असल्याचे या वेळी ग्रामस्थांनी सांगितले.

या वेळी ग्रामपंचायत सदस्या दीपाली दरेकर यांच्यासमवेत ज्येष्ठ मार्गदर्शक जनार्दन शंकर महाडिक, निलेश भाई दळवी, दिलीप दरेकर, चंद्रकांत पवार, विजय विहुळेकर, विजय महाडिक, भाई दळवी, संतोष विहुलेकर, प्रकाश अंधेरे, अशोक सुर्वे, नरेश अंधेरे, धोंडू घाडगे, दीपाली दरेकर, प्रियांका अंधेरे, विजया विहुळेकर, द्रौपती विहुळेकर, मिनाआई विहुळेकर, निर्मला दळवी, चित्रा पवार, निलिमा पवार, जानकी पवार, संजय विहुळेकर व इतर ग्रामस्थांनी पक्षप्रवेश केला असल्याची माहिती भाजप युवा मोर्चा दक्षिण रायगड जिल्ह्याध्यक्ष निलेश थोरे यांनी प्रसार माध्यमांना दिली.

या वेळी भाजप हा केवळ एक पक्ष नसून परिवार आहे व परिवारातील नवीन सदस्यांचे मनःपूर्वक स्वागत करतानाच ग्रामस्थांना अभिप्रेत असणारी विकासकामे व सामाजिक पाठबळ देण्याचे काम भारतीय जनता पार्टीतर्फे करण्यात येईल, केंद्र शासनाच्या राज्य शासनाच्या सर्व कल्याणकारी योजना प्रत्येक गावागावात पोहोचवून समाजातील शेवटच्या घटकाला त्याचा लाभ मिळवून देण्यासाठी भाजपाचा प्रत्येक कार्यकर्ता झटणार असल्याचे भाजप युवक जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी या वेळी सांगितले.

या वेळी ज्येष्ठ नेते कुर्ले अण्णा, संजय आप्पा ढवळे, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष रुपाली कासारे, माणगाव तालुका अध्यक्ष परेशजी सांगले, महिला मोर्चा अध्यक्षा रचना थोरे, सरचिटणीस बाबुराव चव्हाण, तालुका उपाध्यक्ष सुधीर म्हामुणकर, महादेव कदम, संतोष कळंबे, अनिल दांडेकर, आत्माराम डवले, नयन पोटले, युवा मोर्चा सरचिटणीस श्रीराम कळंबे, केतन अडीत, अमोल पवार, नितीन शेलार, निखिल साळुंखे, राजू तेटगुरे, अनिकेत कांबळे उपस्थित होते.

या पक्षप्रवेशाकरिता तालुका उपाध्यक्ष सुधीर म्हामुणकर, निलेश दळवी व जनार्दन महाडिक यांनी विशेष प्रयत्न केले असून विभागामध्ये भाजप जोरदार मोर्चेबांधणी करत असल्याचे दिसत आहे.

# निजामपूरच्या मोफत नेत्रतपासणी शिबिराचा ३०० रुग्णांना लाभ

## ४० शस्त्रक्रिया अन् चष्मेवाटप

**माणगाव : प्रतिनिधी**



निजामपूर परिसरात सामाजिक बांधिलकीतून आरोग्यविषयक उपक्रम राबविण्याचा प्रशंसनीय उपक्रम नुकताच झाला. झुनझुनवाला व शंकरा आय हॉस्पिटल पनवेल तसेच जमातूल मुस्लिमीन, मस्जिद व मस्जिद मोहल्ला, निजामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.२१) निजामपूर बसस्थानकासमोर यशफिन लॅबोरेटरी येथे मोफत नेत्र तपासणी, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया तसेच विविध नेत्रविकारांवर उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळून तब्बल ३०० हून अधिक रुग्णांची तपासणी करण्यात आली तर ४० मोतीबिंदू रुग्ण आढळल्याने त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. तर ४० नेत्र रुग्णांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन व संयोजन निजामपूर येथील जमातूल मुस्लिमीन मस्जिद व मस्जिद मोहल्ला संस्थे तर्फे करण्यात आले. या वेळी मस्जिद मोहल्ला अध्यक्ष अ. गणी हसन जळगावकर, छोटा मोहल्ला अध्यक्ष इलयास इस्माईल सांगळे, उपाध्यक्ष अ. रज्जाक उमर लोखंडे, खजिनदार शौकत उस्मान राऊत, सेक्रेटरी मुराद अहमद जळगावकर, निजामपूर ग्रामपंचायत सरपंच राजाभाऊ रणपिसे, माजी सरपंच बाळाराम दबडे, रहिमत परदेशी, नुरमहमद राऊत, हसन मुजावर, मुस्तकीम सांगळे, मौलाना यासीर, मोहन कोळवणकर आदी मान्यवर उपस्थित होते. दोन्ही मोहल्यांचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने ग्रामस्थ मंडळीही उपस्थित होते.

संस्थेच्या सामाजिक बांधिलकीची माहिती देताना पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, गेल्या वर्षीही मोफत रक्ततपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. यंदा नेत्र शिबिरानंतर पुढील काळात रक्तदान शिबिर, विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन, हृदयरोग तपासणी, शैक्षणिक व आरोग्यविषयक उपक्रम राबवले जाणार आहेत. तर ग्रामपंचायत सरपंच राजाभाऊ रणपिसे यांनी संस्थेच्या सामाजिक शैक्षणिक आरोग्य क्षेत्रातील केलेल्या कामाचे कौतुक केले.

# कोळसावाहक ट्रकला तांबाटीजवळ आग

**खालापूर : प्रतिनिधी**



खोपोली-पेण रस्त्यावर तांबाटी गावाजवळ कोळशाच्या ट्रकला आग लागली. कोळसा गरम असल्याने चालकाच्या केबिनमधील लाकडाच्या फळीने आग पकडली असल्याचा सांगण्यात येत आहे.

पेण-वडखळ येथे कोळसा भरून नाशिकला जात असताना तांबटी गावजवळ कोळसा गरम असल्याने चालकाच्या केबिनमधील लाकडी फळीने आग पकडली.

खोपोली नगरपालिका अग्निशमन दल, गोदरेज कंपनी अग्निशमन दल खालापूर पोलीस यांनी घटनास्थळी दाखल होत आगीवर नियंत्रण मिळवले. ही घटना सोमवारी रात्री १०.३० वाजता सुमारास घडली.



**रोहा : शहरात उत्तर भारतीय संघाच्या वतीने गेली ४३ वर्ष नवरात्र उत्सव साजरा करण्यात येत असून या वर्षी विराजमान झालेली देवी.**



**चौक : नांदी फाऊंडेशनच्या आंतरराष्ट्रीय सीइओ गॅलरी यांनी खालापूर तालुक्यातील चौक येथील आदर्श मित्र मंडळ कोल्हापूर पेठ यांच्या नवरात्री उत्सवाला भेट देऊन अंबामातेचे दर्शन घेतले. या वेळी त्यांच्यासमवेत नांदी फाऊंडेशनच्या राज्य सीईओ दिव्या, चौक ग्रामपंचायतीच्या सरपंच रितू ठोंबरे, निखिल मालुसरे, सुभाष पवार आदी उपस्थित होते.**

# खांडपाले येथील लुंबिनी बौद्धविहारात वर्षावास पुष्प

**माणगाव : बातमीदार**



पंचशील बौद्धजन सेवा संघ, बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रं. ८४१ आणि पंचशील महिला सेवा संघ गोरेगाव विभाग यांनी आयोजित केलेल्या वर्षावास प्रवचन मालिकेचे अकरावे पुष्प शनिवारी खांडपाले लुंबिणी बौध्द विहारा मध्ये विकासदादा गायकवाड यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

या वेळी प्रमुख वक्ते प्रबोधनकार सूर्यकांत कासे यांनी बोलताना सांगितले की, तृष्णा हे दुःखाचे कारण आहे. तृष्णेवर नियंत्रण ठेवल्याने दुःखाचे निवारण होते. तरच माणूस सुखी होतो असे तथागत भगवान गौतम बुद्ध हे मानव जातीच्या कल्याणकरिता शोध घेणारे जगातील सर्वात महान पहिले संशोधक आहेत. त्यांनी विज्ञानावर आधारीत बौद्ध धम्माचा उपदेश केला.

जगात देव नाही, आत्मा नाही. माणूस आणि माणसाचे कर्म हाच धम्म आहे. माणसाने आर्य अष्टांगिक मार्गाने जीवन जगले तर सुखी होईल. आर्यअष्टांगिक मार्ग म्हणजे सम्यक संकल्प, सम्यक दृष्टी, सम्यक वाचा, सम्यक कृती, सम्यक आजीविका, सम्यक स्मृती, सम्यक समाधी, सम्यक व्यायाम यावर आधारित बौद्ध धम्म सांगितला.

या वेळी बौद्धजन पंचायत समितीचे अध्यक्ष चंद्रमणी साळवी, महिला संघाच्या अध्यक्ष सुप्रिया साळवी, विश्वस्त उपाध्यक्ष अ‍ॅड.विलास लोखंडे, सचिव संदीप साळवी, विश्वस्त डॉ. दिलीप साळवी, सचिव संघमित्रा गायकवाड, उपसचिव,पंकज लोखंडे, नितेश लोखंडे,रेश्मा रमेश साळवी यांनी सूत्रसंचलन केले.

तुकाराम लोखंडे, शरद मोरे, विजय मोरे, बळीराम हाटे, हरीभाऊ हाटे, सुरेश जाधव, दिनेश तांबे, श्रीकांत साळवी, सम्यक महाडिक, पंचशील महिला संघाच्या खजिनदार उषा हाटे, राखी मोरे, सुषमा चंद्रमणी साळवी, अपर्णा लोखंडे, प्रज्ञा प्रकाश गायकवाड, विद्या लोखंडे, प्रिया लोखंडे, गौतमी अशोक तांबे, समीक्षा महाडिक, दीपाली महाडिक, राजश्री साळवी,जयश्री सोनवणे, लक्ष्मी तांबे, जयश्री हाटे, भारती साळवी, शीला वसंत मोरे, विद्या हिरामण महाडिक, नैना नरेश शिंदे, कविता शिंदे, छाया नामदेव शिंदे, राजश्री मनोहर मोरे, रंजित राजेंद्र शिंदे, सुशीला लक्ष्मण मोरे, सुशीला सुरेश शिंदे, खांडपाले गावचे सुरेश लोखंडे, बबन लोखंडे, विजय लोखंडे, नितेश लोखंडे, पंकज लोखंडे, राहुल लोखंडे, दिनेश लोखंडे, प्रकाश लोखंडे, यशवंत लोखंडे, शैलेश लोखंडे यांनी व्यवस्थापन केले.

# मुरूडचे ग्रामदैवत कोटेश्वरी माता

**मुरूड : प्रतिनिधी**



मुरूड शहराच्या वेशीतून प्रवेश करताना दर्शन घडते ते ग्रामदैवता श्री कोटेश्वरी मातेचे. शिवरायांच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या या ऐतिहासिक भूमीत आध्यात्मिक वारसा आजही त्याच भक्तिभावाने जोपासला जात आहे. कोट म्हणजे किल्ला आणि ईश्वरी म्हणजे देवी म्हणुन कोटेश्वरी माता.

संस्थानच्या कार्यरत असणारे रामजी नारायण दिवेकर आणि रामचंद्र बाळु कोर्लेकर यांनी या कामी शिष्टाई केल्याचे बुजुर्ग सांगतात. नवरात्रौत्सवात संपुर्ण पंचक्रोशी आबालवृद्धांसह दर्शनासाठी अधीर होतात. पुजा-अर्चा , होम-हवन, भजन-पुजन, हळद-कुंकूवा सारखे धार्मिक कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने पार पाडतात. देवस्थान मंडळाच्या विश्वस्त कमिटी मध्ये गावातील प्रत्येक जातीचा सहभाग उल्लेखनीय म्हणावा लागेल.

१९७० मध्ये मंदिराचा जीर्णाव्दार झाला असुन दरवर्षी चैत्र शुद्ध चतुर्दशीला मोठी यात्रा भरते. कोटेश्वरी मातेचे हे साक्षात तुळजाभवानीचे रुप जागृत देवस्थान मानले जाते. व्याघ्रावर आरूढ झालेल्या आदिशक्तीच्या रुप अतिशय तेज पुंज व मोहक दिसते. नवरात्रौत्सवात नऊ दिवस सकाळी ५ वाजल्यापासून ते रात्री १० वाजेपर्यंत मंदिर खुला असणार आहे. या नऊ दिवसांत ६६ भक्तगणांकडुन देवीला साडी प्रधान करण्यासाठी आल्याने. भक्तगण नाराज होऊ नये त्याकरिता नंबरप्रमाणे रोज भक्तगणांकडुन दोन साडी देवीला अर्पण करण्यात येणार आहे.तसेच स्थानिक महिला भजन मंडळाना संधी देण्यात आली असुन मंदिरात रोज भजनाचा कार्यक्रम होणार आहे. तसेच सकाळ दुपार व रात्री आरती होणार आहे, अशी माहिती कोटेश्वरी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष नयन कर्णिक यांनी दिली.

# नागोठण्यात जोगेश्वरी मातेच्या नवरात्रोत्सवास प्रारंभ



**नागोठणे : बातमीदार**

नागोठण्याची आराध्य ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता, श्री भैरवनाथ महाराज व श्री व्याघ्रेश्वर या देवतांची सोमवारी (दि.२२)) दुपारी घटस्थापना करून श्री जोगेश्वरी मातेच्या नवरात्रौत्सवास प्रारंभ करण्यात आला. या वेळी श्री जोगेश्वरी माता देवस्थान विश्वस्त समितीचे अध्यक्ष नरेंद्रशेठ जैन व सचिव भाईसाहेब टके, नवरात्रौत्सव समितीचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवरात्रौत्सवा निमित्त नागोठण्याची ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता व भैरवनाथ महाराज यांचे मुखवटे व दागिने सुरक्षित ठिकाणा वरून श्री जोगेश्वरी माता देवस्थान विश्वस्त समितीचे सचिव भाईसाहेब टके यांच्या निवासस्थानी आणून श्री जोगेश्वरी माता व श्री भैरवनाथ महाराज यांच्या मुखवटेंची श्री भाईसाहेब टके व दिपाली टके यांच्या हस्ते पूजाअर्चा झाल्यानंतर आरती घेण्यात आली. त्यानंतर दिलीपभाई टके यांच्या निवासस्थानातुन गोंधळ्याच्या साथीने मुखवटे व दागिने वाजत गाजत फटाक्यांची अतिशबाजी करीत मंदिरात नेण्यात आले.

यावेळी विश्वस्त समितीचे अध्यक्ष नरेंद्र जैन, सचिव भाईसाहेब टके, उत्सव समितीचे माजी अध्यक्ष विलास चौलकर, खडकआळी ग्रामस्थ मंडळ अध्यक्ष तात्या खंडागळे, लायन्स क्लब अध्यक्ष सखाराम ताडकर, हरीश टके, मनोज टके, चेतन टके, पंकज टके, उत्सव समितीचे अध्यक्ष चंद्रकांत ताडकर, उपाध्यक्ष संतोष चितळकर, सचिव विवेक देशपांडे, खजिनदार जितेंद्र कजबजे, सदस्य दिगंबर खराडे, राजेंद्र गुरव, पांडुरंग कामथे, अनंत चितळकर, सुदर्शन कोटकर, हितेश भोय, संजय पाटील, सुभाष ताडकर, प्रशांत पानकर आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

गुरुवार दि. २ ऑक्टोबर पर्यंत चालणाऱ्या या नवरात्रौत्सवात दररोज सायंकाळी महाआरती, रास गरबा, दांडिया नृत्य याबरोबरच भजन, श्री दुर्गामाता सप्तशती पाठ, भोंडला नृत्य, हळदी कुंकू, रोज रात्री साडेनऊ वाजता कीर्तन सोहळ्याबरोबरच विविध भरगच्च धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन नऊ दिवस करण्यात आले आहे.

नागोठण्याची ग्रामदेवता श्री जोगेश्वरी मातेच्या नवरात्रौत्सव सोहळा दरम्यान शहर व परिसरांतील हजारो भाविक मातेचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात येत असतात. हा नवरात्रौत्सव सोहळा यशस्वी होण्यासाठी श्री जोगेश्वरी माता देवस्थानचे विश्वस्त समितीचे अध्यक्ष नरेंद्र जैन, सचिव भाईसाहेब टके व विश्वस्त मंडळाच्या मार्गदर्शनाखाली उत्सव समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, इतर पदाधिकारी व सदस्य मेहनत घेत आहेत.

# ‘पोलादपूरच्या डोंगर-दऱ्यांतील ग्रामस्थ इतिहासाचे खरे वारसदार’

**पोलादपूर : प्रतिनिधी**



सातारा संस्थानापासून प्रतापगडच्या पायथ्याशी वसलेल्या पोलादपूर तालुक्यातील डोंगर-दऱ्यांतील ग्रामस्थ इतिहासाचे खरे वारसदार असून प्रत्येकाची कौटूंबिक पार्श्वभूमी थेट शिवकालीन इतिहासासाबत नाते सांगणारी आहे, असे प्रतिपादन श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल संस्था मुंबईतर्फे वीर तानाजी मालुसरे पुरस्कार २०२५ प्राप्त झालेले मुंबई मराठी वृत्तपत्र लेखक संघाचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे यांनी केले.

पोलादपूर तालुक्यातील रानवडी बुद्रुक येथे माजी सरपंच निवृत्ती उतेकर यांच्या प्रांगणात आयोजित सत्कार समारंभप्रसंगी व्यासपिठावर ह.भ.प.कंक महाराज, ह.भ.प. मोराणकर महाराज, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबईचे कोकण विभागीय अध्यक्ष शैलेश पालकर, भाजप मंडळ अध्यक्ष वैभव चांदे, भारतीय सैनादलातील अधिकारी उमेश पवार, रानवडीचे पोलीस पाटील जाधव तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

या पेळी रवींद्र मालुसरे यांनी, पोलादपूर तालुक्याचा इतिहास उलगडण्यासाठी आता अभ्यासक तयार होत असताना ज्या पुराव्यांआधारे अभ्यास करावा असे पुरावे दस्तावेज काळाच्या ओघात लोप पावले असल्याचे सांगून विविध संशोधनकार्यातील अनुभव कथन केले.

या वेळी भाजप मंडळ अध्यक्ष वैभव चांदे यांनी केवनाळे भूस्खलनावेळी साक्षी नावाच्या मुलीच्या पायासाठी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामार्फत भरघोस मदत मिळण्याची आठवण उदधृत केली तर रानवडीचे पोलीस पाटील यांनी रवींद्र मालुसरे यांच्या आठवणींना उजाळा दिली.

ह.भ.प.कंक महाराज यांनी, रवींद्र मालुसरे हे विठ्ठलआण्णा मालुसरे यांच्या संस्कारी कुटूंबातील सुशिक्षित आणि सदविचारी व्यक्तिमत्व असून अभ्यासाचा आवाका प्रचंड असल्याने त्यांच्या कारकिर्दीला असंख्य पुरस्कार गौरव प्राप्त होतील, असा विश्वास व्यक्त केला. ह.भ.प. मोराणकर महाराज यांनी, अटलबिहारी वाजपेयींसारख्या कवीमनाच्या पंतप्रधानांच्याहस्ते रवींद्र मालुसरेंना पुरस्कार मिळाल्याची आठवण या निमित्ताने निघणे म्हणजे, यांच्या विद्वत्तेचा आवाका स्पष्ट होत असल्याचे सांगितले.

या वेळी रवींद्र मालुसरे यांच्या भगिनी गीता उतेकर यांनी त्यांचे औक्षण केले तर सूत्रसंचालन ज्ञानेश्वर उतेकर यांनी केले. यावेळी श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल संस्था मुंबईतर्फे वीर तानाजी मालुसरे पुरस्कार २०२५ प्राप्त झाल्याबद्दल रवींद्र मालुसरे यांचा रानवडी ग्रामस्थांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भव्य सत्कार केला.

# कॅरम लीगमध्ये राजेश गोहिल विजेता

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय कॅरम लीग स्पर्धेत कामोठे येथील राजेश गोहिल याने विजेतेपद पटकाविले. रसायनीचा एजाज मुजावर उपविजेता ठरला. पनवेल येथील सुरेश बिस्ट याने तृतीय, तर पनवेल येथील आशिष देशमाने याने चतुर्थ कमांक मिळवला.



रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनतर्फे रविवारी कमळ पतसंस्थेच्या डायलेसिस सेंटर येथे ही स्पर्धा खेळविण्यात आली. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील अव्वल ३२ खेळांडू सहभागी झाले होते. स्पर्धेला कुलकर्णी, रियॉलिटर्स आणि होम टू होम प्रॉपर्टिजच्या या उद्योजकांनी प्रायोजकत्व दिले होते.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश तुळपुळे, कार्यवाह दीपक साळवी, कार्याध्यक्ष प्रदीप वाईंगडे, चिटणीस अभिजीत तुळपुळे यांनी विशेष परिश्रम घेतले. पंच प्रमुख म्हणून आशिष बावकर यांनी काम पाहिले, तर राजन पांचाळ यांनी उपपंचप्रमुख म्हणून काम पाहिले.

**स्पर्धेचा सविस्तर निकाल**

राजेश गोहिल (विजेता), एजाज मुजावर (उपविजेता), सुरेश बिष्ट (तृतीय क्रमांक), आशिष देशमाने (चतुर्थ कमांक), स्वप्नील पानवलकर (पाचवा क्रमांक), संतोष लवांगे (सहावा क्रमांक), सतिश धनावडे (सातवा), वैभव शिंदे (आठवा).

# अॅथलेटिक्स स्पर्धेत एमएनएम विद्यालयाची दमदार कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी अंतर्गत तालुकास्तरीय अॅथलेटिक्स स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एमएनएम विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी केली आहे. या स्पर्धेचे आयोजन न्हावा येथील लेडी खातून मरियम स्कूल येथील भव्य पटांगणावर करण्यात आले होते.



१९ वर्ष वयोगटात पारस सचिन भोईर याने गोळाफेक व थाळीफेकमध्ये सुवर्णपदक, हॅमर थ्रो (हातोडा फेक)मध्ये जीविका पाटील व राणू डांगे सुवर्णपदक, १७ वर्ष वयोगटात ८०० मीटर धावणे स्पर्धेत तौफिक अन्सारी सुवर्णपदक, मुलींमध्ये १०० मीटर धावणे स्पर्धेत सई अविनाश मोकल सुवर्णपदक, प्रिती सहदेव घाडगे कांस्यपदक, रिले मुलींमध्ये प्रिंजल म्हात्रे, सई मोकल, प्रीती घाडगे, स्वरा ठाकूर व प्रियांका लावस्कर यांनी सुवर्णपदक, रिले मुलांमध्ये प्रियांशू निषाद, स्मित पाटील, आकाश नाईक, तौफिक अन्सारी यांनी सुवर्णपदक, १४ वर्ष वयोगटात गोळाफेक व थाळीफेकमध्ये सुरज कुमार सुवर्णपदक, रिले स्पर्धेत सुरज सिंग, रणवीर सिंग, यश कोळी, रूद्र कोळी सुवर्णपदक आणि ४०० मीटर धावणे स्पर्धेत यश दिनेश कोळी याने कांस्यपदक मिळवले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, शाळेचे चेअरमन भार्गव ठाकूर, शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर, उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, प्राथमिक विभागाचे पर्यवेक्षक अरुण जोशी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# नमो युवा रनमध्ये 'सीकेटी'चा सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्ह्याच्या वतीने स्वस्थ आणि नशामुक्त भारताच्या निर्मितीसाठी या शीर्षकाखाली पनवेलमधील वडाळे तलाव येथे नमो युवा रनचे भव्य आयोजन करण्यात आले होते. नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील ३५०पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी या युवा रनमध्ये सहभाग घेतला तसेच शिक्षकांनीही सहभाग नोंदविला.

याबद्दल भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांच्या हस्ते सीकेटी ज्युनिअर कॉलेजचा ट्रॉफी आणि सर्टिफिकेट देऊन सन्मान करण्यात आला.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी आदी उपस्थित होते.





रोहा : शहरातील रोहा मोहल्ला यंग व्हॉलीबॉल ग्रुपच्या वतीने अंजुमन हायस्कूल येथे जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या उद्घाटनावेळी माजी गटनेते महेंद्र गुजर, युवा नेते कादिर रोगे, अजीज महाडकर, इम्तियाज नाडकर, अमिन तुळवे, अकीब महाडकर, मिहीर शुंगारपुरे, अकील रोहावाला, अरफात कडू आदींसह खेळाडू उपस्थित होते.

# पावसाळी क्रीडा स्पर्धेत रातवड विद्यालयाचे यश



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील रातवड माध्यमिक विद्यामंदिरने तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत भरघोस यश संपादन केले आहे. ही दोन दिवसीय स्पर्धा नुकतीच तालुका क्रीडा संकुलात झाली.

स्पर्धेत विद्यालयातील एकूण २५ विद्यार्थी–विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. १४ वर्षाखालील मुलींमध्ये दिया प्रमोद साटम ४०० मी. धावणे प्रथम, १७ वर्षाखालील मुली निधी विनोद फराडे ८०० मी. धावणे द्वितीय, संस्कृती केतन ऐत ८०० मी. धावणे तृतीय, श्रेया राजेंद्र बाईत ३००० मी. धावणे द्वितीय, आर्या यशवंत उंडरे १५०० मी. धावणे तृतीय, १७ वर्ष ४X१०० रिले द्वितीय, क्रॉस कंट्री अंतरा काशीराम पवार प्रथम, संस्कृती संतोष फराडे हिने द्वितीय क्रमांक पटकाविला. प्रथम व द्वितीय क्रमांक विजेत्यांची निवड जिल्हा पातळीवर झाली आहे.

या विद्यार्थ्यांना क्रीडा प्रमुख श्रीकृष्ण गरधे यांनी मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक संतोष कदम यांनी यशस्वी खेळाडू, मार्गदर्शक शिक्षक व सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले. संस्थेचे सरचिटणीस डॉ.निलेश रेवगडे, शालेय समितीचे अध्यक्ष संजय पालकर, पालक, ग्रामस्थांनीही त्यांना जिल्हास्तरावर खेळण्यासाठी शुभेच्छा दिल्या.


















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com